cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–६४ | शुक्रवार, दि.२७ जून २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### शक्तिपिठातली जबरदस्ती!

शक्तिपीठ मार्ग हा राज्याच्या विकासाला चालना देणारा असून राज्याच्या पूर्वेकडील पवनार (वर्धा) येथून पश्चिमेकडील पत्रादेवी (सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र–गोवा सीमेला जोडणारा आहे. मंत्रिमंडळ बैठकीत मंगळवारी 'महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग' (शीघ्रसंचार द्रुतगती मार्ग) प्रकल्पाला मान्यता देण्यात आली. मात्र कोल्हापूरचे मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी या प्रकल्पासंदर्भात सरकारने पुनर्विचार करून निर्णय घेण्याची विनंती केली. लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर–सांगली भागात महायुतीला बसलेला फटका लक्षात घेता, पुन्हा त्याच भागात शेतकऱ्यांचा रोष ओढवून घेणे,

### सरकारी कार्यालयांमध्ये वाढदिवस, वैयक्तिक समारंभांवर बंदी

मुंबई–महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने मोठा निर्णय घेतला असून सरकारी कार्यालयात वैयक्तिक समारंभ (उदा. वाढदिवस) साजरे करण्यास स्पष्ट मनाई करण्यात आली आहे. जमावबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडून निर्बंध घेलण्यात आले आहेत. कार्यालयीन वेळेत समारंभांमुळे नागरिकांच्या कामात अडथळा निर्माण होत असल्याचे कारण दिलंय. सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांना कार्यालयीन वेळेत वाढदिवस वा कोणतेही खासगी समारंभ साजरे करण्यास बंदी घालण्यात आली असून, अशा प्रकारांच्या तक्रारी मिळाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

## थोडक्यात...

### ३२ हजार आरोग्य कर्मचाऱ्यांच्या पगाराचा निधी मंजूर

मुंबई–३२ हजार कंत्राटी आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा दोन महिन्यांपासून पगार थकला होता. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने ३०१ कोटीचा निधी यासाठी मंजूर केला आहे. अखिल भारतीय समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेचे राज्य अध्यक्ष डॉ. दत्ता मुळे आणि राज्य उपाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर बागल यांनी राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

### ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीत स्नान

पुणे–संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीत स्नान घातले जात आहे,हा सोहळा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी भाविक नीरा नदी किनारी दाखल झाले आहे

### राज ठाकरेंचा सरकारवर हल्लाबोल

मुंबई–जेएनपीटीत भरती आहे. त्याच्या इंटरव्ह्यू अदानी पोर्टला सुरू आहे. काय चालू आहे महाराष्ट्रात. तुम्ही भाषेवर गोष्टी आणतात, जमिनी जात आहे, भाषा घालवण्याचा प्रयत्न सुरू आहे. काय चालू आहे महाराष्ट्रात, अनेक विषय महाराष्ट्राशी संबंधित त्याला सामूहिक विरोध, खासकरून हिंदीला भाषेच्या सक्तीला आहे. त्यासाठी ६ तारखेचा मोर्चा आहे, असे राज ठाकरे म्हणाले.

### जंगल सफारीची सुविधा बंद

मुंबई–पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्र, बोर व्याघ्र प्रकल्प आणि उमरेड पवनी कऱ्हान्डला अभयारण्यात जंगल सफारीची सुविधा एक जुलैपासून पुढील आदेशापर्यंत बंद असणार आहे. पावसाळ्याला सुरुवात झाल्यामुळे वन विभागांने हा निर्णय घेतला आहे.

### धाराशिवमधील शक्तिपीठच्या भूसंपादनाला स्थगिती

धाराशिव : जिल्ह्यातील शक्तिपीठच्या भूसंपादनाला स्थगिती देण्यात आली असून शक्तिपीठ महामार्गाची भूसंपादन प्रक्रिया थांबवली आहे. मंगळवारपर्यंत भूसंपादन प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली आहे. राजू शेट्टी आणि प्रशासनाशी चर्चेनंतर स्थगितीची निर्णय घेण्यात आला आहे.

### वादग्रस्त विधानावर बबनराव लोणीकरांची माफी

जालना : जालन्यातील भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी माफी मागितली आहे. मात्र माफी मागतानाही त्यांची मग्रुरी कायम असल्याचंच दिसून आलं आहे. चुकलो नसलो तरी माफी मागतो असं बबनराव लोणीकर यांनी माफी मागताना म्हंटलंय. परतूरमध्ये एका कार्यक्रमात बोलताना लोणीकरांची जीभ घसरली होती.

### संयुक्त निवेदनावर सही करण्यास भारताचा नकार

नवी दिल्ली : चीनमध्ये पार पडलेल्या बैठकीत संयुक्त निवेदनावर स्वाक्षरी करण्यास संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी नकार दिला आहे. पाकिस्तान आणि चीन दहशतवादाच्या मुद्यावरुन लक्ष हटवण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे राजनाथ सिंह यांनी संयुक्त दस्ताऐवजावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला आहे.

### कृषिमंत्र्यांनी इतरांना कर्ज भरण्याचा सल्ला देऊ नये– बच्चू कडू

अमरावती : कृषीमंत्र्यांनी इतरांना कर्ज भरण्याचा सल्ला देऊ नये. कारण त्यांच्यावरच १३ कोटींचे कर्ज थकीत आहे. त्यांनी आधी ते कर्ज भरावं इतरांना कर्ज भरण्याचा सल्ला देऊ नये असा इसारा बच्चू कडूंनी दिला आहे. कृषीमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी भांडायला हवं मात्र तेच शेतकऱ्यांना कर्ज भरण्याचे सल्ले देत असतील तर त्यांना घेराव घालावा लागेल असा इशाराही बच्चू कडूंनी दिला आहे.

### राज्यातल्या खरीप पेरण्या रखडल्या

मुंबई : राज्यभरात मोसमी पाऊस सक्रीय झाला असला तरीही पावसाच्या वितरणात असमानता आहे. कुठे अति पावसामुळे शेतशिवारात चिखल आहे, तर कुठे अद्याप पुरेसा पाऊस झालेला नाही. प्रामुख्याने विदर्भात पुरेसा पाऊस नसल्यामुळे आणि उर्वरीत महाराष्ट्रात अति पावसामुळे खरीप पेरण्या रखडल्या आहेत. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार २५ जूनपर्यंत सरासरीच्या ३९ टक्के पेरण्या झाल्यात.लातूर विभागात लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोलीत ५८ टक्के पेरण्या झाल्यात. पुणे विभागातील अहिल्यानगर, पुणे आणि सोलापुरात ५१ टक्के आणि अमरावती विभागातील पश्चिम विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती आणि यवतमाळमध्ये ४२ टक्के पेरण्या झाल्यात. त्याखालोखाल छत्रपती संभाजीनगर विभागात ३७ टक्के, नाशिक विभागात ३९ टक्के पेरण्या झाल्या आहेत.

# कृषी विभागाचा स्टॉक फक्त कागदावरच !

## शेतकऱ्यांना खते नाही, खरीप हंगामात मोठा धोका

**पुणे । प्रतिनिधी**

**खरीप हंगाम सुरू झालेला असतानाच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांना युरिया आणि डीएपी या अत्यावश्यक रासायनिक खतांची तीव्र टंचाई भासत आहे. कृषी विभागाच्या कागदोपत्री आकडेवारीनुसार खतांचा पुरेसा साठा दाखवला जात असला तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना खत मिळत नसल्याने ते मोठ्या अडचणीत आले आहेत. यामुळे खरीप हंगामात मोठा धोका निर्माण झाला आहे.**



राज्यातील अनेक जिल्ह्यांत पावसाळ्याच्या सुरुवातीस पेरण्या सुरू असून याच काळात खतांचा पहिला डोस देणे अत्यंत आवश्यक असतो. मात्र, युरिया आणि डीएपी खत न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना पेरणीनंतरही खताचा डोस देता आलेला नाही, परिणामी पिकांची वाढ खुंटण्याची भीती निर्माण झाली आहे. युरिया हे नायट्रोजनयुक्त खत असून, झाडांच्या सुरुवातीच्या वाढीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. झाडाला हिरवळ, गडद पाने, वेगवान वाढ आणि पोषण मिळवून देण्यासाठी युरियाचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे डीएपी (डाय–अमोनियम फॉस्फेट) हे खत नायट्रोजन आणि फॉस्फरस या दोन आवश्यक पोषक घटकांनी समृद्ध आहे. यामध्ये १८ टक्के नायट्रोजन आणि ४६ टक्के फॉस्फरस असतो, जो मुळांची वाढ, झाडांची बळकटी, फुलोऱ्याची गुणवत्ता आणि उत्पादन क्षमतेसाठी महत्त्वाचा घटक आहे. खतांचा डोस वेळेवर मिळाल्यास झाडांची वाढ चांगली होते आणि शेवटी उत्पादनात वाढ दिसून येते. मात्र, खत

◀◀ पान २ वर

### पारदर्शक वितरण यंत्रणेची गरज

खत न मिळाल्याने उत्पादन घटल्यास नफा तर दूरच, पण पेरणीवर केलेली गुंतवणूकही परत मिळेल की नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे सरकारने खत वितरणाची जबाबदारी केवळ कागदोपत्री आकड्यांवर न ठेवता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने होत आहे. त्याचबरोबर बफर स्टॉकचा उपयोग वेळेवर आणि योग्य शेतकऱ्यांपर्यंत व्हावा, यासाठी पारदर्शक वितरण यंत्रणा निर्माण करणे गरजेचे आहे.

# हिंदी सक्तीविरुद्ध महाराष्ट्र एकवटणार...!

## ५ जुलै २०२५ रोजी भव्य मोर्चा, राज ठाकरे यांचा पुढाकार

### उबाठा शिवसेना, समन्वय समितीसह सर्वांना सहभागी होण्याचे आवाहन



**मुंबई । प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत पहिलीपासून शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषेचा सक्तीने समावेश करण्याच्या प्रस्तावाला महाराष्ट्रात तीव्र विरोध होत आहे. या मुद्द्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठी भाषा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेच्या रक्षणासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे.**

यापूर्वी ६ जुलै २०२५ रोजी नियोजित असलेला त्रिभाषा सूत्राविरोधी मोर्चा आता एक दिवस आधी, म्हणजेच शनिवार, ५ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता काढण्यात येणार आहे. यासोबतच, दोन स्वतंत्र मोर्चांऐवजी एकच संयुक्त मोर्चा काढण्यासाठी मनसेने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना (उबाठा) पक्षाशी चर्चा सुरू केली आहे. राज ठाकरे यांनी सर्व राजकीय पक्ष,




सामाजिक संघटना आणि मराठी जनतेला या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. गुरूवारी सकाळी पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी मराठी भाषेच्या रक्षणासाठी सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन केले. विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना (उबाठा) पक्षाशी संयुक्त मोर्चासाठी चर्चा करण्याची तयारी दर्शवली.

◀◀ पान २ वर


### एक मोर्चा, एक आवाज

त्रिभाषा सूत्राविरोधी समन्वय समितीने यापूर्वी ७ जुलै रोजी मोर्चाचे आयोजन जाहीर केले होते, ज्याला उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने पाठिंबा दिला होता. त्यानंतर मनसेने ६ जुलै रोजी स्वतंत्र मोर्चाची घोषणा केली होती. मात्र, दोन स्वतंत्र मोर्चांमुळे मराठी अस्मितेचा संदेश कमकुवत होऊ नये, यासाठी मनसे, शिवसेना (उबाठा) आणि त्रिभाषा समन्वय समिती यांच्यात एकच संयुक्त मोर्चा काढण्याबाबत चर्चा सुरू आहे.

### मराठीसाठी महाराष्ट्राचा लढा

केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत पहिलीपासून हिंदी भाषेचा सक्तीने समावेश करण्याच्या प्रस्तावाने महाराष्ट्रात असंतोष पसरला आहे. मराठी भाषेचे महत्त्व आणि स्थानिक भाषांना प्राधान्य मिळावे, यासाठी राज ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. "हिंदीच्या सक्तीमुळे मराठी भाषेचे आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे नुकसान होईल. हा लढा मराठी माणसाच्या स्वाभिमानाचा आहे. मराठी भाषेला दुय्यम स्थान मिळणार नाही, यासाठी आपण सगळ्यांनी एकत्र यायला हवे," असे राज ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# ३० जून पासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन तीन आठवड्यांपर्यंत चालविण्याचा निर्णय गुरुवारी (२६जून) विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जून ते १८ जुलैदरम्यान मुंबईत चालणार आहे. या १९ दिवसांच्या कालावधीतील अधिवेशनाचे प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस १५ असून शनिवार आणि रविवार असे चार दिवस सार्वजनिक सुट्यांचे असणार आहेत.**

या पावसाळी अधिवेशनात हिंदी सक्ती, शक्तिपीठ महामार्ग आणि कर्जमाफी या मुद्यांवर महायुती सरकारला विरोध होण्याची शक्यता आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच २९ जून रोजी नेहमीप्रमाणे चहापानाचा कार्यक्रम होईल. या कार्यक्रमात विरोधक उपस्थिती लावणार की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने विरोधी पक्षाचे आमदार विविध समस्या आणि मुद्यांवर सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करतील. महायुती सरकारचे सर्व मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्री अशा प्रकारे एकमेकांना सामोरे जाणार, हे बघावे लागेल. विधिमंडळ अधिवेशन हे विविध समस्या आणि मुद्यांवर सरकारला घेरण्याची

◀◀ पान २ वर

### दोन नक्षल्यांना कंठस्नान

नारायणपूरः छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यातील अबुझमाड भागात पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत

◀◀ पान २ वर

# संसद नव्हे तर संविधानच सर्वोच्च !

## मूलभूत रचना बदलण्याचा अधिकार नाही – सरन्यायाधीश गवई


**अमरावती । वृत्तसंस्था**

देशातील तीन प्रमुख स्तंभ कार्यपालिका, विधीमंडळ आणि न्यायपालिका. हे सर्व संविधानाच्या चौकटीत कार्यरत असतात. संसद सर्वोच्च आहे, असे अनेकजण मानतात, मात्र प्रत्यक्षात सर्वोच्च असते ते संविधान, असे परखड मत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डॉ. बी. आर. गवई यांनी व्यक्त केले आहे.

सुप्रीम कोर्टाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतलेले न्यायमूर्ती गवई आपल्या मूळगावी अमरावती येथे आयोजित सत्कार समारंभात बोलत होते. अमरावती येथील वकिल संघाच्यावतीने त्यांचा सत्कार झाला. सरन्यायाधीश गवई यांनी केसवानंद भारती वि. केरळ राज्य या १९७३ मधील ऐतिहासिक खटल्याचा संदर्भ देताना सांगितले की, या निर्णयात सर्वोच्च

◀◀ पान २ वर

# दुचाकी वाहनांवर टोल आकारण्याचा कोणताही प्रस्ताव नाही–नितीन गडकरी



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

दुचाकी वाहनांवर टोल कर लादण्याबाबत केंद्र सरकारचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे स्पष्टीकरण केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी दिले. याबाबत दिशाभूल करणारी माहिती पसरवली जात असल्याचे नितीन गडकरी यांनी 'एक्स'वर पोस्ट करुन म्हटले. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) देखील दुचाकीवर टोल कर लादण्याच्या बातम्या खोटे असल्याचे स्पष्टीकरण दिले.

केंद्र सरकार १५ जुलैपासून दुचाकी वाहनांवर देखील टोल कर आकारणार असल्याचा दावा काही माध्यमांनी केला. सोशल मीडियावर


◀◀ पान २ वर

# नमस्कार फ्रॉम स्पेस !

## शुभांशू शुक्ला अंतराळात दाखल, भारताची अभिमानास्पद झेप

**न्यूयॉर्क । वृत्तसंस्था**

**भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर गुरुवारी दुपारी ४:०१ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात सुखरूप दाखल झाले आहेत. हे सर्व अंतराळवीर सुमारे २८ तासांच्या प्रवासानंतर आयएसएसमध्ये पोहोचले आहेत. दरम्यान, ॲक्सिओम स्पेसने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये शुभांशू यांनी त्यांच्या अंतराळ प्रवासाच्या रोमांचक अनुभवाचे वर्णन केले.**




व्हीडीओमध्ये शुभांशू म्हणतात, नमस्कार फ्रॉम स्पेस. मला खूप अभिमान वाटतोय. माझ्या खांद्यावरचा तिरंगा सांगत होता की, सर्व देशवासी माझ्यासोबत आहेत. भारताच्या मानवी अंतराळ उड्डाणासाठी हे एक मोठे पाऊल आहे. अंतराळ प्रवास हा माझ्यासाठी स्वप्नासारखा अनुभव आहे. प्रक्षेपणानंतर जेव्हा मी पृथ्वी पाहिली, तेव्हा असे वाटले की, जणू एखाद्या चित्रकाराने निळे आणि हिरवे रंग मिसळून कॅनव्हास बनवला आहे. ड्रॅगन अंतराळयान प्रक्षेपणानंतर १० मिनिटांनी रॉकेटपासून वेगळे झाले, तेव्हा मला खिडकीतून सूर्याची चमक आणि तारे दिसले. माझ्यासाठी ते अविश्वसनीय

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: २७.५० क्विंटल | २,४९१ | २,८०० | २,६२० |
| ज्वारी/हायब्रिड: ८८.०० क्विंटल | १,९०० | ३,१०० | २,४४९ |
| मका/लोकल:८.५० क्विंटल | २,२२५ | २,२२५ | २,२२५ |
| तूर : १९.५० क्विंटल | ६,१०० | ६,६७६ | ६,४९६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ६६.०० क्विंटल | १,९०० | २,५८४ | २,३३३ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा:३.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |

cmyk

## अग्रलेख

# शक्तिपिठातली जबरदस्ती !

शक्तिपीठ मार्ग हा राज्याच्या विकासाला चालना देणारा असून राज्याच्या पूर्वेकडील पवनार (वर्धा) येथून पश्चिमेकडील पत्रादेवी (सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र-गोवा सीमेला जोडणारा आहे. मंत्रिमंडळ बैठकीत मंगळवारी 'महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्ग' (शीघ्रसंचार द्रुतगती मार्ग) प्रकल्पाला मान्यता देण्यात आली. मात्र कोल्हापूरचे मंत्री प्रकाश आबिटकर आणि हसन मुश्रीफ यांनी या प्रकल्पासंदर्भात सरकारने पुनर्विचार करून निर्णय घेण्याची विनंती केली. लोकसभा निवडणुकीत कोल्हापूर-सांगली भागात महायुतीला बसलेला फटका लक्षात घेता, पुन्हा त्याच भागात शेतकऱ्यांचा रोष ओढवून घेणे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सरकारला धोकादायक ठरू शकते असे मत दोन्ही मंत्र्यांनी व्यक्त केले. वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग अशा राज्यातील एकूण १२ जिल्ह्यांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग ८०२.५९२ किमी लांबीचा असून तो समृद्धी महामार्गापेक्षाही जास्त लांबीचा आहे. शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा विरोध कायम आहे. मात्र तरीही हा प्रकल्प रेटून नेण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे.

या महामार्गामुळे माहूर, तुळजापूर, कोल्हापूर तसेच अंबाजोगाई ही राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. संतांची कर्मभूमी असलेले मराठीचे आद्यकवी अंबाजोगाईस्थित मुकुंदराज स्वामी, जोगाईदेवी तसेच १२ ज्योतिर्लिंगांपैकी औंढा नागनाथ व परळी वैजनाथ, महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर यासह कारंजा-लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर ही दत्तगुरूंची धार्मिक स्थळे जोडली जाणार आहेत. या महामार्गामुळे नागपूर ते गोवा हे १८ तासांच्या प्रवासाचे अंतर ८ तासांवर येणार आहे. महामार्गाला कोल्हापुरातील मंत्र्यांनी विरोध दर्शविल्याने जिल्ह्याला 'वळसा' घालून प्रकल्प राबविण्याबाबत विचार सुरू झाला आहे. मात्र, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कोल्हापूरकरांची नाराजी तूर्त दूर करण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कमाल जमीन धारणा कमी आहे. नागपूर-रत्नागिरी हा पर्यायी मार्ग अस्तित्वात असल्यामुळे शेतकरी सुपीक जमीन देण्यास तयार नाहीत. शक्तिपीठ महामार्गात शेतकऱ्यांची सुपीक जमीन जाणार असल्याने शेतकऱ्यांचा याला कडाडून विरोध आहे. या महामार्गाचे सर्वेक्षण ठिकठिकाणी रोखण्यात आले होते. माजी खासदार राजू शेट्टी आणि माजी मंत्री सतेज पाटील यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहत मोठे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मंत्रिमंडळ बैठकीत या महामार्गासाठी आर्थिक तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी हुडकोकडून १२ हजार कोटींचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. या निधीतून सुमारे ७ हजार ५०० हेक्टरचे भूसंपादन केले जाणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणार आहे. कोल्हापुरातून नागपूर-रत्नागिरी महामार्ग गेला आहे. तो प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाला समांतर आहे. त्यामुळे पुन्हा शक्तिपीठ महामार्गाला जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध आहे. हा विरोध दिवसेंदिवस वाढत असल्याने सद्यस्थितीत कोल्हापुरात भूसंपादन करू नये. नागपूर-रत्नागिरी महामार्गाचे रुंदीकरण करून शक्तिपीठ महामार्ग या महामार्गाला जोडावा. ज्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीही जाणार नाहीत आणि वाहतुकीला अडथळाही निर्माण होणार नाही, अशी भूमिका आबिटकर आणि मुश्रिफ या मंत्र्यांनी घेतल्याचे सांगितले जाते. उभय मंत्र्यांच्या भूमिकेमुळे मुख्यमंत्र्यांनी नागपूर-रत्नागिरी महामार्गाचे रुंदीकरण करून शक्तिपीठ महामार्ग या महामार्गाला जोडण्याचा पर्याय खुला ठेवला असून मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि संबंधित मंत्री यांच्या संयुक्त बैठकीत याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सांगितले जाते. कोल्हापूरमध्ये भूसंपादनाला होणारा विरोध लक्षात घेता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सावध पवित्रा घेतला आहे. भूसंपादनासाठी कोणावरही जबरदस्ती केली जाणार नाही. चर्चेतून मार्ग काढला जाईल असे शिंदे म्हणाले. कोल्हापूरमध्ये शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढवण्यावर शिंदे यांचा भर असल्याने त्यांनी काहीशी मवाळ भूमिका घेतल्याचे बोलले जाते. शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधातील लढा यापुढेही चालूच राहील असे काँग्रेस आमदार सतेज पाटील आणि शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी जाहीर केले आहे. शक्तिपीठ जोड मोहिमेची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. ती प्रत्यक्षात आणण्याचे प्रयत्न त्यांचे चेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार हे उघड आहे. त्याशिवाय 'शायनिंग इंडिया' सत्यात कसे उतरेल?

# प्रभारी हिवताप अधिकारी यांच्या विरोधात कर्मचाऱ्यांची एकजूट

**जालना । प्रतिनिधी**

**कर्मचाऱ्यांची अडवणूक व आर्थिक मिळवणूक केल्याच्या तक्रारीवरून तत्कालीन प्रभारी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. यांची चौकशी करण्यासाठी आलेल्या सदस्य समितीने गुरुवारी कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदवले.**



महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन कर्मचारी संघटनेच्या जालना शाखेतर्फे गत १४ मे रोजी आरोग्य कर्मचाऱ्यांनी लेखी तक्रार दिली होती. यात कर्मचाऱ्यांची अडवणूक होत असल्यामुळे डॉ. यांच्याकडील प्रभारी जिल्हा हिवताप अधिकारी पदाचा पदभार काढण्यात यावा असे म्हटले होते. दरम्यान, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी कारणे दाखवा नोटीस बजावत ४८ तासात खुलासा मागवला होता. मात्र सदरील मुदतीत फुलाचा अन्न आल्यामुळे डॉ. भुसारे यांनी डॉ. यांच्याकडील प्रभारी पदभार काढून घेतला होता. शिवाय, याच प्रकरणात डॉ. राऊत यांची चौकशी करण्यासाठी पुणे येथील सहसंचालक यांनी यांच्या आदेशावरून सहाय्यक संचालक ( छत्रपती संभाजीनगर) यांनी श्री सदस्य समिती नियुक्त केली होती, सदर समितीने गुरुवारी तक्रारदार आरोग्य कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदवले. चौकशी समितीतील सदस्य असे डॉ. आर. एम. सोनवणे (जिल्हा हिवताप अधिकारी, परभणी), डॉ. वैशाली पाटील (जिल्हा हत्तीरोग अधिकारी छत्रपती संभाजीनगर) व एस.एच. गुडा (वरिष्ठ लिपिक, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा हिवताप, छत्रपती संभाजी नगर). सदर समितीपुढे आरोग्य कर्मचाऱ्यांनी आपले जबाब नोंदवले असून आता समितीला या तीन दिवसात आपला अहवाल वरिष्ठांना द्यावयाचा आहे. त्यामुळे समितीच्या अहवालानुसार डॉ. राऊत यांच्यावर काय कार्यवाही होते, याकडे आरोग्य कर्मचाऱ्यांची लक्ष लागले आहे.

# जाणीव ग्रुपच्या कार्यांचे सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी केले कौतुक

## सकाळच्या प्रहरी दिलखुलास चर्चा

**बीड। प्रतिनिधी**

**जाणीव ग्रुपच्या माध्यमातून बीडमध्ये सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य गौरवास्पद आहे. विविध क्षेत्रातील कार्यक्षम व्यक्तींनी एकत्रित येऊन स्थापन केलेल्या जाणून ग्रुपचे कार्य पाहून आणि सर्वांना भेटून आपल्याला आनंद झाला, असे प्रतिपादन नामांकित आणि सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी केले. बीड येथे मंगळवार दिनाक २४ जून २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता जाणीव ग्रुपच्या सदिच्छा भेटीदरम्यान ॲड. उज्ज्वल निकम बोलत होते.**

याप्रसंगी सरकारी वकीलॲड. निकम यांनी, दहशतवादी हल्ल्यातील आरोपी अजमल कसाब आणि इतर महत्वाच्या खटल्याविषयी माहिती दिली. या खटल्यातील अनेक प्रसंग सांगून उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. सुमारे तासाभराच्या वेळात उपस्थित सर्वांचे म्हणणे एकूण दिलखुलास आणि समर्पक चर्चा केली. यावेळी बीड येथील ॲड. बाळासाहेब कोल्हे यांची उपस्थिती होती. प्रारंभी जाणीव ग्रुपचे अध्यक्ष ॲड. विवेकानंद सानप यांनी उज्ज्वल निकम यांनी ॲड. उज्ज्वल आपल्या भाषणात ॲड. उज्ज्वल निकम यांच्या कार्यकृत्वाची माहिती देऊन गौरवोउद्गार काढले. या वेळी जाणीवचे अध्यक्ष ॲड विवेकानंद सानप यांनी शासकीय जिल्हा रुग्णालयातील खिचडी उपक्रम, वृक्षारोपण, वंचित घटकांना वेळच्यावेळी केलेली आर्थिक मदत,संत ज्ञानेश्वर पालखी सोहळ्यात जाणिवची दिंडी व सहभाग इ.माहिती विषद केली. याप्रसंगी जाणीवचे दिलीप गोरे,तुकाराम पवार, प्रा.ज्ञानेश्वर मुंढे,डॉ.सुरज कोकणे,ॲड रामभाऊ काशीद,अशोक धांडे,नाना जाधव,गणेश मुळे, ॲड सुभाष पिसुरे, डॉ,शहादेव जगताप,डॉ अविनाश देशपांडे,श्रीराम बहिर, शैलेश लहाने,ॲड हनुमंत शिंदे,बाबा मोराळे, संभाजी मंदे, डॉ.शिवाजी सानप, अनंत खेडकर,यांच्यासह जाणीवचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# विधी संघर्ष बालकाकडुन ४ जिवंत काडतुस, गावठी पिस्टल व धारधार तलवार जप्त

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड पोलिस ठाण्यातील डि.बी. पथकाने विधी संघर्ष बालकाकडुन ४ जिवंत काडतुस, गावठी पिस्टल व धारधार तलवार जप्त केली आहे.**

२६ जून रोजी पोलिस ठाणे अंबडचे डी.बी. पथक राणी उंचेगाव भागात अवैध धंदे कारवाई व माहिती काढण्याकरीता गस्त करीत असतांना राणी उंचेगाव भागातील गोपनिय बातमीदाराकडुन माहिती कि, राणी उंचेगाव भागात एक नविन ईसम आलेला असुन त्यांच्याजवळ धारधार तलवार व कमरेला पिस्टल असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. मिळालेली माहिती डी बी पथकाने पोलीस ठाणे अंबड चे प्रभारी पोलीस अधिकारी श्री एस ए घोडके यांना व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल खांबे यांना दिली. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे नमुद संशयीत ईसमास डी बी पथकाचे पोउपनि भगवान नरोडे, पोहेका यशवंत मुंढे, पोहेका दिपक पाटील व पोशिक्रं अरुण मुंढे यांनी ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन ०१ सिल्वर रंगाची पिस्टल, ०४ जिवंत काडतुसे व १ धारधार तलवार मिळुन आल्याने त्यांला ताब्यात घेण्यात आले. पोलीस ठाणे अंबड येथे आल्यावर त्यांच्या वयाबाबत खात्री केली असता तो विधी संघर्ष बालक असल्याचे दिसुन आले आहे. तरी नमुद प्रकरणात पोलीस ठाणे अंबड जि जालना येथे गुरन ३४२/२०२५ कलम ३/२५ व ४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन जप्त पिस्टल कोठे व कोणकडुन खरेदी केली याबाबत अधिक तपास अंबड पोलीस करीत आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बन्सल , अपर पोलीस अधिक्षक श्री आयुष नोपानी , उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल खांबे यांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे पोलीस ठाणे अंबड चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री संतोष घोडके, पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे, पोहेका यशवंत मुंढे, पोहेका दिपक पाटील व पोशिक्रं अरुण मुंढे यांनी केलेली आहे.

# शेतकऱ्यांविरोधी बोललो नाही परंतु विषय शेतकऱ्यांचा असेल तर हजार वेळा माफी मागायला तयार-आ.लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

**गेली ४० वर्ष राजकीय आणि सामाजिक जीवनात काम करत असताना मी सातत्याने शेतकऱ्यांची बाजू घेतली आहे शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी पंचवीस पंचवीस हजार शेतकऱ्यांची मोर्चे काढले आहेत सातत्याने शेतकऱ्यांची बाजू घेत गारपीट असेल दुष्काळ असेल अशा नैसर्गिक संकटांमध्ये शेतकऱ्यांच्या बाजूने भूमिका घेत अनेक वेळा शासनासोबत लढा दिला आहे मी स्वत: शेतकरी कुटुंबातील असून मला शेतकऱ्यांचे दु:ख कळत त्यामुळे मी शेतकऱ्याविरोधी बोलूच शकत नाही, यापूर्वीही बोललो नाही, यापुढेही बोलणार नाही. परंतु विषय शेतकऱ्यांचा असेल तर मी हजार वेळा माफी मागायला तयार असल्याचे प्रतिपादन माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केले.**



जालना भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषद प्राथमिक आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी बोलताना लोणीकर म्हणाले की, ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांना वडील या शब्दापेक्षा बाप आणि आई या शब्दापेक्षा माय हा शब्द अधिक प्रचलित वाटतो. ग्रामीण भागात जी भाषा जो शब्दप्रयोग प्रचलित आहे त्यानुसार बोलावं लागतं. त्यामुळे बाप या शब्दाचा शब्दाचा माझ्या भाषणातून झाला परंतु हे बोलत असताना मी हे सर्व शब्द शेतकऱ्यांना विरोधी किंवा शेतकऱ्यांसाठी वापरलेले नाही. पक्षातील काही पेड सोशल मीडिया चालवणाऱ्या १०-१२ लोकांचे टोळके कायम पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माझ्या विरोधी निरर्थक आणि तथ्यहीन बाबी समाज माध्यमांवर टाकत रोल करत असतात त्यांच्याबद्दल सांगताना मी ''हे'' बोललो आहे. ट्रोल करणारे हे लोक त्यांच्या कुटुंबामध्ये केंद्र व राज्य सरकारच्या सगळे योजनांचा लाभ घेतात त्यामध्ये किसान सन्मान योजना लाडकी बहिणी योजना संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना यासारख्या विविध योजनांचा समावेश असतो शासनाच्या सर्व योजनांचा लाभ घ्यायचा आणि पुन्हा मोदी फडणवीसांना ट्रोल करायचं त्यासाठी विरोधी पक्षाकडून त्यांना पॅकेज दिले जाते त्यामुळे त्या १०-१२ लोकांच्या टोक या संदर्भात वाटूर येथील सभेमध्ये मी बोललो होतो असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मी सातत्याने आवाज उठवला असून सत्ताधारी आमदार असताना सुद्धा शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा मुद्दा या वर्षी झालेल्या अर्थसंकल्प अधिवेशनामध्ये मी सर्वप्रथम मांडला. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मी सातत्याने शेतकऱ्यांच्या बाजूने भूमिका घेतली आहे सत्तेत असो किंवा नसो माझी शेतकऱ्यांच्या बाजूने असलेली भूमिका कधीही बदललेली नाही यापुढे देखील बदलणार नाही त्यामुळे मी शेतकऱ्यांच्या विरोधी बोलण्याचा प्रश्नच येत नाही माझ्या बोलण्याचा राजकीय फायदा घेण्याच्या दृष्टीने विरोधकांनी भांडवल करत मीडियासमोर विपर्यास केला आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

# जिल्ह्यातील एकही सुशिक्षीत तरुण बेरोजगार राहणार नाही-मंत्री मंगलप्रभात लोढा

**जालना । प्रतिनिधी**

**राज्यात जालना हे औद्योगिकीकरण झपाट्याने वाढणारे शहर म्हणून नावारुपास येत आहे. येथील तरुणांच्या हाताला काम मिळण्यासाठी तसेच स्वयंरोजगाराच्या वाटा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासन सकारात्मक पावले टाकत आहेत. तरी स्थानिक औद्योगिक कंपन्यामध्ये ज्या रोजगार कौशल्याची मागणी असेल त्या व्यवसायातील प्रशिक्षण देवून उमेदवारात कौशल्य वाढवून कुशल मनुष्यबळ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले जाईल. त्यामुळे प्रत्येकाच्या हाताला काम मिळाल्याने जालना जिल्ह्यातील एकही सुशिक्षीत तरुण बेरोजगार राहणार नाही, अशी नि:संदिग्ध ग्वाही राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.**

कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, कौशल्य विकास विभाग आयुक्त लहू माळी, कौशल्य विकास विभाग सहायक आयुक्त गणेश चिमणकर, यांच्यासह संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. मंत्री श्री.लोढा म्हणाले की, उद्योजक व शासन एकत्र येवून काम केले तर निश्चित महाराष्ट्राची भरभराट होईल. याकरीता पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप महत्वाची आहे. ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत राबवून कुशल मनुष्यबळाची निर्मिती केली जाणार आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यातून ४० कंपन्यांनी आज रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. कायदा व सुव्यवस्था आणि मनुष्यबळ या आधारावरच नवीन उद्योग उभारत असतो. उद्योग उभारणीत कुशल मनुष्यबळ अत्यंत महत्वाचा घटक आहे. त्यामुळे कुशल मनुष्यबळाची उभारणी करणे गरजेचे आहे. उद्योजकांच्या तांत्रिक गरजेनूसार आयटीआयच्या माध्यमातून नवनवीन व्यवसाय चालु करण्यात येणार आहेत. नवीन व्यवसायासाठी लागणारी मशिनरी शासनाकडून तातडीने पुरविण्यात येईल. संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी गुणवत्तेसह प्रामाणिकपणे आपले काम पार पाडावे. अशी सुचनाही त्यांनी यावेळी केली. जनसंवाद/जनता दरबार, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसंदर्भात बैठक, पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव जिल्हास्तरीय समिती बैठक, जिल्हा कौशल्य विभाग आढावा बैठक, संस्था व्यवस्थापन समितीच्या मॅरेथॉन बैठका घेत संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश दिले. सर्व बैठकीस आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, कौशल्य विकास विभाग सहायक आयुक्त गणेश चिमणकर, यांच्यासह संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पान १ वरून...

**कृषी विभागाचा**

मिळत नसल्याने शेतकऱ्यांना पिकांची वाढ न होणे, झाडे पिवळी पडणे, रोगराई वाढणे आणि उत्पादनात घट होण्यासारख्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. कृषी विभागाकडून दावा केला जात आहे की खतांचा पुरेसा साठा आहे आणि तो लवकरच वितरित केला जाईल. पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांना खत घेण्यासाठी दुकाने चकरा माराव्या लागत आहेत. काही ठिकाणी खासगी विक्रेतेही युरिया आणि डीएपीचा काळाबाजार करत असून ते शासकीय दरांपेक्षा जास्त किंमतीला विकत आहेत. त्यामुळे गरीब आणि सीमांत शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

---------

**३० जून पासून विधिमंडळाचे**

उत्तम संधी असते. मंत्र्यांना विरोधकांनी सभागृहात विचारलेल्या प्रश्न आणि समस्यांबाबत अधिकृतरीत्या सर्वांसमोर भूमिका मांडावी लागते. सध्या राज्यात शाळांमधील पहिलीपासूनच हिंदी विषयाची सक्ती आणि शक्तिपीठ महामार्गाचा मुद्दा गाजत आहे. त्यामुळे अधिवेशनात याचे पडसाद उमटू शकतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, राज्य सरकारने त्रिभाषा धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला असता. त्यानुसार, सरकारने सुरुवातीपासूनच राज्यातील शाळांमध्ये तीन भाषा शिकवण्याचा निर्णय होता. तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती सुरुवातीला करण्यात आली होती. मात्र, प्रचंड टीका झाल्यानंतर राज्य सरकारने शुद्धिपत्र काढून हिंदी भाषेच्या अनिवार्यतेची अट मागे घेतली होती. मात्र, या धोरणाला मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्यासह अन्य विरोधकांनी कडाडून विरोध केला होता. त्याचे पडसाद यंदाच्या अधिवेशनात उमटतील.

-------------

**हिंदी सक्तीविरुद्ध महाराष्ट्र**

''हिंदीच्या सक्तीविरोधात हा मोर्चा आहे. यात सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि मराठी माणूस सहभागी व्हावा. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेशीही आम्ही बोलू. आमची माणसे त्यांच्या नेत्यांशी संपर्क साधतील. कोणत्याही राजकीय वादापेक्षा महाराष्ट्र आणि मराठी भाषा मोठी आहे. ५ जुलैला हे सर्वांना दिसेल, असे राज ठाकरे यांनी ठणकावून सांगितले. स्थानिक हक्क आणि महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी आंदोलने केली आहेत. या मोर्चाद्वारे मराठी जनतेला एकत्र आणून केंद्र सरकारला ठोस संदेश देण्याचा त्यांचा मानस आहे. ५ जुलै रोजी होणाऱ्या या मोर्चाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

-------

**दोन नक्षल्यांना कंठस्नान**

जवानांनी २ नक्षलवाद्यांना ठार मारले. ३१५ बोअरच्या रायफल आणि इतर शस्त्रे देखील जप्त करण्यात आली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कोहकामेटा परिसरात नक्षलवादी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, नारायणपूर येथील डीआरजी आणि कोंडागाव येथील एसटीएफ जवानांना नक्षलवादी कारवाईसाठी पाठवण्यात आले. बुधवारी रात्री जेव्हा सैनिक नक्षलवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणी पोहोचले तेव्हा नक्षलवाद्यांनी गोळीबार सुरू केला. गुरूवारी सकाळी सैनिकांनी शोध मोहीम राबवली तेव्हा दोन नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले.

-------------

**दुचाकी वाहनांवर टोल आकारण्याचा**

देखील याबाबत चर्चा झाली. त्यामुळे काँग्रेस नेत्यांसह विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर निशाणा साधायला सुरुवात केली. दरम्यान, ही सर्व माहिती खोटी असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी म्हटले. ते म्हणाले की, काही माध्यमे दुचाकी वाहनांवर टोल कर लादण्याबाबत दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवत आहेत. असा कोणताही निर्णय प्रस्तावित नाही. दुचाकी वाहनांना टोलवर पूर्णपणे सूट देणे सुरूच राहील. सत्य जाणून न घेता दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवून खळबळ उडवण्याचा त्यांनी निषेध व्यक्त केला. एनएचएआयने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, दुचाकी वाहनांवर टोल शुल्क आकारण्याचा सरकारचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. दुचाकी वाहनांसाठी टोल आकारण्याची कोणतीही योजना नाही. सर्व माहिती खोटी असल्याचे एनएचएआयने म्हटले.

----------

**संसद नव्हे तर संविधानच**

न्यायालयाने स्पष्ट केले की संविधानाची मूलभूत रचना बदलता येणार नाही. आपल्याकडे केवळ अधिकार नाही, तर संविधानाने दिलेली जबाबदारी आहे. फक्त सरकारविरोधात निर्णय देणे म्हणजे स्वायत्तता नाही, असे ते म्हणाले. सरन्यायाधीश गवई म्हणाले की, संसदेकडे संविधानात दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे, मात्र ती संविधानाच्या मूलभूत रचनेत बदल करू शकत नाही. संसदेचा अधिकार फक्त दुरुस्त्या करण्यापुरता आहे, संविधानाची मूलभूत रचना बदलण्याचा अधिकार नाही, असे ते म्हणाले. न्यायाधीशांनी स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे आणि लोक काय म्हणतील याचा विचार करून निर्णय घेणे हे न्यायनिवाड्याच्या तत्त्वाला हरताळ फासणारे ठरते, असे सरन्यायाधीश गवई यांनी स्पष्ट केले. गेल्या वर्षी बुलडोझर न्याय प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे समर्थन करताना, सरन्यायाधीश गवई म्हणाले की, निवारा हा एक मूलभूत हक्क आहे. कोणत्याही मालमत्तेचे अतिक्रमण हटविण्यापूर्वी किमान १५ दिवसांची नोटीस देणे आवश्यक आहे, असे या निर्णयात स्पष्ट करण्यात आले होते. नागरिकांची घरे पाडून त्यांचा आवाज दडपता येणार नाहीत, असेही न्यायालयाने म्हटले होते.

-------------

**नमस्कार फ्रॉम**

होते. हा माझा प्रवास नाही, तर भारताच्या अंतराळ कार्यक्रमाची सुरुवात आहे. माझ्याद्वारे तुम्हीही या प्रवासाचा पुरेपूर आनंद घ्या. हे एक नवीन आणि आव्हान वातावरण आहे. मी माझ्या सहकारी अंतराळवीरांसोबत हा अनुभव खूप एन्जॉय करत आहे. आम्ही तुम्हाला जॉय आणि ग्रेस दाखवले. हे एक हंस असून एक महत्त्वाचे प्रतीक आहे. ते खूप गोंडस दिसते, आपल्या भारतीय संस्कृतीत हंस बुद्धिमत्तेचे प्रतीक आहे. मला वाटते की पोलंड, हंगेरी आणि भारतातही त्याचे प्रतीकात्मक महत्त्व आहे. हा योगायोग वाटेल, पण तसे नाही. याचा अर्थ यापेक्षा खूप जास्त आहे, असेही शुभांशू म्हणाले. दरम्यान, ॲक्सिओम मिशन-४ अंतर्गत चार अंतराळवीर बुधवारी दुपारी १२ वाजता आयएसएससाठी रवाना झाले. त्यांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटला जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमधून केनेडी स्पेस सेंटरमधून उड्डाण केले होते. तांत्रिक बिघाड आणि हवामानाच्या समस्यांमुळे हे मिशन ६ वेळा पुढे ढकलण्यात आले होते.

-------------


## जाहीर प्रगटन

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय शिरूर का. जि.बीड**

Email. tahshildarshirurkasar@gmail.com

दूरध्वनी क्रमांक ०२४४२५९३५९

क्र.२०२५/विलंब मृत्यू नोंद जाहीर प्रगटन

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्वायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये दाखल प्रकरणात मृत्यू नोंद घेण्या बाबत

ज्याअर्थी अर्जदार नामे सीताबाई पि. रामकिसन देवगडे रा.आर्वी ता. शिरूर कासार जि. बीड यांनी स्वतःचे वडील मयत नामे राम किसन श्रीपती देवगडे रा. आर्वी, ता. शिरूर कासार, जि. बीड यांचा मृत्यू दिनांक २३/०५/२०२० रोजी आर्वी, ता. शिरूर कासार, जि. बीड येथे झाल्याचा विलंब मृत्यू नोंदणी आदेश मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी या मृत्यू दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा. अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून अर्जाची सोनवणे घेऊन विलंबाने मृत्यू नोंद घेण्या बाबत आदेश केला जाईल.

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**

**सुरेश घोळवे**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर कासार**

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. २७ जून २०२५
३

# एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय मधील समाजशास्त्र विभागाने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्ताने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे हे होते. तर कार्यशाळेचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.अशोक देवगुडे हे उपस्थित होते. कार्यशाळेसाठी व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. विनोद किर्दक तसेच समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनिल जाधव उपस्थित होते. प्रा अशोक देवगुडे यांनी राजर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा सविस्तरपणे आढावा घेतला. प्रथमत: कार्यक्रमाचे प्रस्ताविक विभागप्रमुख प्रा.डॉ.सुनिल जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे संचलन प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी तर आभार प्रा. डॉ. शिवाजी काकडे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेसाठी बी.ए. द्वितीय वर्षाचे अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. याचप्रमाणे महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि भिमशक्ती यांनी काढलेल्या आक्रोश मोर्चाने अंबाजोगाई शहर दणाणले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिवाळी पासून निराधारांच्या बँक खात्यावर एकही रूपया जमा नाही. त्यांना मानधन मिळाले नाही. याच्या निषेधार्थ गुरूवार, दिनांक २६ जुन रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालयावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट), भिमशक्ती यांनी काढलेल्या आक्रोश मोर्चाने अंबाजोगाई शहर दणाणले. निषेधाच्या घोषणा देत, झेंडे आणि फलक घेऊन शेकडो स्त्री, पुरूष व ज्येष्ठ नागरिक या मोर्चात सहभागी झाले.

या मोर्चा आंदोलनाबाबत बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांनी सांगितले की, आमच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिनजी खरात, भिमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री खासदार चंद्रकांतजी हांडोरे यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाईत गुरूवार रोजी तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या संदर्भात आम्ही प्रशासनाला निवेदन देवून पुर्व कल्पना दिली होती. गुरूवारी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) आणि भिमशक्तीच्या वतीने दोन स्वतंत्र निवेदने देण्यात आली. दोन ही निवेदनांत नमूद केले आहे की, १) संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, दिव्यांग बांधवांना ३०००/- रूपये प्रति महिना मानधन वाढ करा., २) तहसिल कार्यालयाकडून वयोवृध्द लाभार्थी यांची केवायसी, डिबीटीच्या नांवाखाली होणारे हेलपाटे थांबवावे व जाचक अटी रद्द कराव्यात., ३) शासन आपल्या दारी योजनेखाली तहसिल कार्यालयामार्फत वयोवृध्द लाभार्थी ज्यांचे अंगठा (थंम्ब) लागत नाहीत. त्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन यादी तयार करून त्यांना तात्काळ लाभ द्यावा. आणि ४) संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेमध्ये निकष निवडीसाठी रू.२१,०००/- ची अट रद्द करून ती रू.५०,०००/- पर्यंत करावी या मागण्यांचा समावेश आहे. सदरील निवेदनाच्या प्रतिलिपी - १) जिल्हाधिकारी, बीड., २) उपविभागीय अधिकारी आणि ३) पोलीस निरीक्षक, शहर पोलीस स्टेशन अंबाजोगाई यांना देण्यात आल्या आहेत. अंबाजोगाई तालुक्यातील २७ हजार निराधार हे त्यांच्या हक्काच्या अनुदानापासून वंचित




आहेत. त्यामध्ये संजय गांधी निराधार, श्रावणबाळ निराधार, दिव्यांग बांधवांसाठी शासनाकडून दिले जाणारे मानधन हे मागील ९ महिन्यांपासून तहसिल प्रशासनाच्या दप्तर दिरंगाईमुळे मिळालेले नाही. या सर्व योजनेमध्ये लाभार्थी असणारे बहुसंख्य लोक हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांना तहसील कार्यालयामध्ये खेटे मारावे लागत आहेत. निराधार लोकांना मिळणारे मानधन नेमके कोणत्या कारणामुळे थकविले गेले आहे. याचे समाधानकारक उत्तर तहसिल कार्यालयाकडून मिळत नसल्यामुळे आज गुरूवार, दिनांक २६ जुन रोजी सकाळी ठिक ११:३० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून आक्रोश मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा तहसिल कार्यालय, अंबाजोगाई येथे धडकला. मोर्चेकऱ्यांना अक्षय युवराज भुंबे, जीवन गायकवाड, धीमंत राष्ट्रपाल आणि मुक्ता पाडुळे (संवेदना फेलो) यांनी संबोधित केले. यावेळी सदरील मागण्यांचे निवेदन तहसिलदार विलास तरंगे यांनी स्विकारले. या मोर्चाचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट), भिमशक्ती संघटना यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी मोर्चेकऱ्यांचे नेतृत्व भिमशक्ती संघटनेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय युवराज भुंबे, बीड जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड, भिमशक्तीचे बीड जिल्हा संघटक धीमंत राष्ट्रपाल यांनी केले. तर मोर्चाच्या यशस्वितेसाठी भिमशक्तीचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष सुमित आवाडे, मुक्ता पाडुळे (संवेदना फेलो), मिनाताई लोंढे, रेखाताई मस्के, मुक्ता पाडुळे, नितीन गोदाम, बादल तरकसे, विशाल बनसोडे, शंकरदादा उजगरे, शेरूभाई पठाण, लखन गायकवाड, राम गायकवाड, अमन कोकाटे यांनी पुढाकार घेतला.

**पैशांची उधळपट्टी ; वयोवृद्धांची हेळसांड**

एकिकडे भाजप सरकारचा नाकर्तेपणा आणि चुकीच्या धोरणांमुळे तिजोरीत खडखडाट आहे, त्यातच संसद आणि विविध राज्यांमधील अंदाज समित्यांची परिषद नुकतीच २३ आणि २४ जून रोजी मुंबई विधानभवनात झाली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह विविध राज्यांच्या अंदाज समित्यांचे अध्यक्ष परिषदेला हजर होते. दोन दिवसांच्या अंदाज समिती परिषदेत चांदीच्या ताटात सहाशे प्रतिनिधींना जेवण दिले. यासाठी झालेला लाखोंचा खर्च पाहता ही पैशांची उधळपट्टी आहे. तर दुसरीकडे हजारो निराधारांना मागील ९ महीन्यांपासून त्यांच्या हक्काच्या अनुदानापासूनच वंचित राहावे लागत आहे. हा विरोधाभास आहे. निराधारांची हेळसांड थांबविण्यासाठी व याचा जाब विचारण्यासाठी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने निराधार स्त्री-पुरूष सहभागी झाले. निवेदनातील मागणीप्रमाणे तहसिलदार विलास तरंगे साहेबांनी मोर्चाला संबोधित करताना शासनाकडे पाठपुरावा करून पुढील १५ दिवसांत अनुदानापासून वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा करू असे आश्वासन दिले आहे. वेळीच वयोवृद्ध निराधारांची हेळसांड थांबविली नाही. तर यापुढे आक्रमक पवित्रा घेतला जाईल याची नोंद शासन व प्रशासनाने घ्यावी.

अक्षय भुंबे

मराठवाडा विभागीय अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट)

# जय जवान विद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील मौजे कवडगाव येथील जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बु येथील विद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पावन प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. सदरील कार्यक्रम साठी संस्था अध्यक्षा,सचिव, संस्थेचे पदाधिकारी, सरपंच उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य व पदाधिकारी गावातील सर्व मान्यवर ग्रामस्थ, शिक्षण प्रेमी पालक वृंद माजी विद्यार्थी मंडळ व विद्यालयातील प्राचार्य व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरवातीला उपस्थित सर्व मान्यवर ग्रामस्थ यांच्या व विद्यालयातील प्राचार्य श्री सारोक्ते डी. जी सर आदी सर्वांच्या हस्ते आरक्षणाचे जनक, सर्व सामान्य जनतेला शिक्षणाची सोय निर्माण करून देणारे, वसतिगृह उभा करणारे राजे छत्रपती शाहू महाराज यांच्या पावन प्रतिमेचे पूजन उपस्थित सर्व मान्यवर व्यक्तींच्या हस्ते पुष्प हार व पुष्प अर्पण करून करण्यात आले.शाहू महाराजांचा जन्म २६ जून इ.स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई



यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व शाहू हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजी राव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. या वेळी त्यांचे वय १७ वर्षांचे होते आणि लक्ष्मीबाई वय १२ वर्षांहून कमी होते. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्या रोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स. १९२२ साला पर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.राजर्षी शाहू हे खरे लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात. शाहू महाराज हे एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत शाहू महाराजांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली. १८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेका पासून ते १९२२ मध्ये त्यांच्या निधना पर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते.

ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित (अस्पृश्य) व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना ''राजर्षी'' ही पदवी त्यांच्या राज्यभिषेका च्या वेळी त्यांना त्याच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाज सुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास ''फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र'' असे म्हणतात. सर्व उपस्थित यांनी जयंती निमित्त विनम्र अभिवादन केले.

# दासखेडच्या आरोग्य केंद्रात डॉ.हरिदास शेलार यांच्या प्रयत्नातून वृक्षलागवड!

पाटोदा । प्रतिनिधी

पर्यावरण संरक्षण सप्ताह उत्साहात मान्यवरांची उपस्थिती पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे संन पावर प्रायव्हेट लिमिटेड दि. २५ जून रोजी फळ झाडें व फुले लागवड करून पर्यावरण संरक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी कंपनीची वतीने झाडं लागवड करण्यात आली. यावेळी प्रकल्प समन्वयक मोहन गाडे मार्गदर्शन केले. वन हक्क प्राप्त गावात शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षा प्रकल्प राबवला जात आहे.निसर्गाचे संरक्षण आणि संगोपन करणे हे आजच्या काळाची गरज आहे.

प्रत्येक व्यक्तीने किमान



आयुष्यात १०० झाडे लावायला पाहिजे, परंतु आजच्या काळात हे चित्र दिसत नसून पर्यावरणाचे महत्व फार कमी दिसून येते. त्यामुळे नागरिकांकडून पर्यावरण संरक्षण आणि संगोपन व्हावे. शाश्वत असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्ती पर्यावरणाचे महत्त्व लोकांना कळावे, म्हणून संन पावर प्रायव्हेट लिमिटेड अंतर्गत शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षा हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.पर्यावरण सप्ताह वन बीज वनस्पती फुले लागवड व पर्यावरण हे आपल्या सभोवतालचे नैसर्गिक जग आहे त्यात हवा पाणी जमीन जंगल आणि सर्व सजीवांचा समावेश आहे. असे प्राणी पक्षी नैसर्गिक संसाधनाचा उपयोग करून आपल्या उपयोगिता कशा वाढवू शकतो. वन बीज बियाण्यांचे महत्त्व यावेळी नागरिकांना पटवून देण्यात आले. जसे की, बिबा हे एक औषधी असून याचा उपयोग गंभीर आजारासाठी होतो.या वेळी.उपस्थित.डॉ शरयू पडेळे. डॉ.युवराज राठोड.सय्यद कादर . महोन गाडे सन पावर प्रायव्हेट लिमिटेड . डॉ हरिदास शेलार.नितेश कुमार राख. गणेश मस्के.राहुल चव्हाण. शेख मिनाज ताई .गणेश बामदळे.लखन पवार.गणेश सरडे. अश्विनी सोनवणे.शुभम राख. तसेच सामाजिक कार्यकर्ते अशोक कोकाटे. दत्ता कोकाटे. किरण कोकाटे. बाबु पवळ हे उपस्थित होते.

# न्यूरो सर्जन डॉ.अमोल कासवा यांची कामगिरी ;पूर्ण भूल न देता ट्युमर काढला

आष्टी । प्रतिनिधी

**अनेक वेळा मेंदूवरील शस्त्रक्रिया रुग्णाला भूल न देता करावी लागते.वैद्यक क्षेत्रात याला अवेक क्रेनिओटॉमी म्हणून ओळखले जाते.मुंबई, पुणे या सारख्या मोठ्या महानगरांत होणा-या या शस्त्रक्रिया आता ग्रामीण भागातही होत आहेत.नगर शहरातील न्यूरॉन प्लस हॉस्पिटलमध्ये अवेक क्रेनिओटॉमीची यशस्वी शस्त्रक्रिया करण्याची कामगिरी न्यूरो सर्जन डॉ.अमोल कासवा यांनी नुकतीच केली आहे.आष्टी तहसिल कार्यालयातील सेवानिवृत्त अव्वल कारकुन राजकुमार पवार यांची कन्या पायल हिच्यावर अतिशय गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली आहे.**

न्यूरो सर्जन डॉ.अमोल कासवा यांचा अवेक क्रेनिओटॉमीमध्ये हातखंडा आहे. काही दिवसांपूर्वी हॉस्पिटलमध्ये एक २५ वर्षीय महिला रूग्ण आली होती. तिला सातत्याने फिट्स येत होत्या. एमआरआय तपासणीत तिच्या उजव्या मेंदूत ट्युमर असल्याचे निदान झाले. उजव्या बाजूच्या मेंदूद्वारे शरीराच्या डाव्या हातापायांचे नियंत्रण होते. अशावेळी शस्त्रक्रिया करायची म्हटले तर रुग्ण पूर्ण शुद्धीत असणे गरजेचे असते,अन्यथा सर्वसाधारणपणे मेंदूतील ट्युमरच्या शस्त्रक्रिया भूल देऊनच केल्या जातात. संबंधि महिला रुग्णाची परिस्थिती पाहता डॉ.कासवा यांनी अवेक क्रेनिओटॉमी



शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला.रुग्ण व रुग्णाच्या नातेवाईकांना याची पूर्ण कल्पना देण्यात आली.अतिशय किचकट आणि सर्जनच्या कौशल्याची परीक्षा पाहणारी ही शस्त्रक्रिया असते. डॉ. कासवा यांनी सदर महिला रुग्णाला विश्वासात

घेऊन शस्त्रक्रिया सुरू केली. तिला कोणत्याही प्रकारची भूल देण्यात आली नव्हती.एकीकडे तिच्याशी संवाद साधत आणि दुसरीकडे कौशल्याने मेंदूतील ट्युमर काढण्याची कामगिरी डॉ.कासवा यांनी केली. ट्युमर काढताना मेंदूतील नियंत्रण केंद्राला धक्का पोहचणार नाही याची पूर्ण काळजी घेण्यात आली. ही शस्त्रक्रिया पूर्ण यशस्वी झाल्याने रुग्ण महिलेचा फीटचा त्रास कमी झाला तसेच संभाव्य पक्षाघातही टळला.या शस्त्रक्रियेबाबत डॉ. अमोल कासवा यांनी सांगितले की,मेंदूवरील शस्त्रक्रिया करताना रुग्णाला पूर्णपणे भूल दिली जाते. अवेक क्रेनि ओटॉमीमध्ये शस्त्रक्रिया करायची तेवढाच भाग बधिर केला जातो,बाकी रुग्ण पूर्णपणे शुद्धीवर व सावध असतो. शस्त्रक्रिया चालू असताना रुग्णाशी सातत्याने बोलत होतो. तिलाही बोलते करीत होतो.कुठे काही वेगळे जाणवत आहे का, ही विचारणा करीत होतो.अखेर ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली व एका रुग्णाला नवीन जीवन देता आल्याचा आंनद झाला.या शस्त्रक्रियेवेळी भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. भूषण लोहोकरे यांनी काम पाहिले. शस्त्रक्रियेचे गुंतागुंतीचे स्वरूप पाहता इलेक्ट्रो फिजिओलॉजिकल मॉनिटरींग साठी अहमदाबाद येथील तज्ज्ञ उपस्थित होते. न्यूरॉन प्लसचे मुख्य वैद्यकीय संचालक डॉ. मुकुंद विधाते व डॉ. अविनाश गाडेकर यांनी डॉ. कासवा यांचे विशेष कौतुक केले.

## पान ६ वरून...

### यशाला परिस्थिती आडवी

अजित देशमुख, उपाध्यक्ष महेशअप्पा शेटे, कोषाध्यक्ष एस.जी.स्वामी, संचालक मुअ आर.पी.मुळे, केंद्रप्रमुख श्री ए.पी.कोपले, प्राचार्य दि.ना.फड, मुख्याध्यापिका श्रीमती एस.के.जाधव, पर्यवेक्षक कृष्णा देशमुख, श्रीमती एस.एस.नखाते, पत्रकार गोविंद जाधव,धनंजय जाधव, परमेश्वर वैद्य, रतन मोती, गणेश जाधव व उध्दव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मा.पुजा पवार यांनी त्यांचा पोलिस उपअधिक्षक पदापर्यंतचा प्रेरक प्रवास सांगु अनेक शिक्षण, करियर्ससाठी सुक्ष्म नियोजन, वेळेचा सदुपयोग, ग्रामीण विद्यार्थ्यांची क्षमता, स्वनियंत्रण, स्वसंरक्षण, स्वत:मधल्या चुका शोधणे, बालविवाह, बीड जिल्ह्यातील पोलिसिंग व गुणवत्ता आदी विषयावर मार्मिक, प्रबोधनात्मक व संदर्भप्रचुर प्रकाश टाकला. याप्रसंगी प्राथमिक विभागाला संलग्न सोमेश्वर किडस्-नर्सरीचा शुभारंभ पोलिस उपअधिक्षक पुजा पवार यांच्या हस्ते करण्यात आला. घाटनांदूर पंचक्रोशित शिक्षणाचा नवा पॅटर्न राबवुन सर्वाधिक निकाल व सर्वोच्य गुणवत्तेचा मानकरी ठरलेल्या सोमेश्वर शैक्षणिक संकुलातील लक्षवेधी सन्मानसोहळ्याचे यशवंत विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमींनी अभिनंदन केले आहे. या सन्मान सोहळ्याचे अभ्यासपुर्ण प्रस्ताविक श्रीमती एस.के.जाधव आणि सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन एफ.एफ.शेख यांनी केले

### व्यसने तात्पुरते समाधान व

ही जाऊ शकतात. त्याचा योग्य औषधोपचार योग्य समुपदेशन आणि त्या व्यसनांमुळे निर्माण झालेली शारीरिक व मानसिक लक्षणे यांचा जर प्रभावीपणे उपचार केला तर ही व्यसने त्या व्यक्तीच्या आयुष्यातून कायमस्वरूपी सोडविली जाऊ शकतात. त्याकरिता रुग्णांनी त्याच्या नातेवाईकांनी आपल्या जवळच्या मानसोपचार तज्ञाकडे किंवा व्यसनमुक्ती तज्ञाकडे जाऊन चर्चा करणे आवश्यक आहे. व्यसनाधीनतेमुळे हजारो संसार उध्वस्त होत आहेत. व्यसनेही त्या एका व्यक्तीच्याच आयुष्यावर परिणाम नाहीत तर त्याच्याशी संबंधित असलेल्या कुटुंबातील इतर व्यक्तींवर ही दुष्परिणाम घडून आणतात. व्यसनाच्या या विळख्यातून मुक्त होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या ओळखीच्या किंवा नातेवाईकाच्या व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन डॉ. राजेश इंगोले यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीर्तीसाठी इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष प्रा सुरेखा शिरसाट खंडाळे ,शेख वाजेद, सचिन साळवे ,मनोज इंगोले, अजित आव्हाड, धम्मा सिताप, कृष्णा सोनपारखे, मयूर गायकवाड ,गोविंद गायकवाड समता मनोहर ,तुषार मनोहर, अजित रापतवार यांनी परिश्रम घेतले.या व्यसनमुक्ती शिबिरात पंचेचाळीस रुग्णांची तपासणी करून त्यांचा औषधोपचार आणि समुपदेशन डॉ राजेश इंगोले यांनी केले.

### पाटोद्यात तालुका आरोग्य

सोहळ्यानिमित्त आरोग्य विभाग गैरहजर आढळून आला असून त्याचप्रमाणे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात गैरहजर होते दिवसभर या ठिकाणी बहुतांशी कंत्राटी कर्मचारी उपस्थित असल्याचे जाणवले सध्या तालुक्यात व्हायरल इन्फेक्शन असून अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्ण मोठ्या प्रमाणात येत आहेत मात्र या ठिकाणी आरोग्य सेवा मिळत नसल्याने अनेक रुग्ण हे खाजगी दवाखान्याचा मार्ग स्वीकारत असल्याचे सध्या चित्र दिसत असून याकडे मात्र वरिष्ठ जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसत असून तरी या सर्व प्रकरणाची चौकशी करून गैरहजर व संबंधितावर कामात कुचराई करणाऱ्यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## पान ६ वरून...

### पायी चालणाऱ्या वारकऱ्यांची

ठेवण्याचे काम महेश मुरकुटे हा युवक गेल्या ६ वर्षापासून करत आहे.सामाजिक कार्याच्या माध्यमातून महेशने आत्तापर्यंत अनेक कामे केली आहेत. मुक्या प्राण्याची अविरत सेवा हा मूळ पिंड त्याने आत्मसात केला आहे तर कोव्हिड १९ मध्ये देखील त्याने रुग्णसेवेचा ध्यास घेतला होता.त्याच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून महेश मुरकुटे यांच्या या सेवाभावी वृत्तीला आत्मसात करून राज्यातील काही युवा युवती देखील त्यांच्या कामामुळे प्रोत्साहित होऊन आपापल्या गावी वारकऱ्यांची सेवा करत आहेत.

### चांगल्या आरोग्यासाठी

घाडगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना युवकांनी व विद्यार्थ्यांनी चांगले जीवन जगण्यासाठी जीवनात कोणतेही तंबाखू युक्त पदार्थाचे सेवन करू नये असे आव्हान केले चांगले आरोग्यासाठी व्यसनास बळी पडू नये अभ्यासाचे स्पर्धा परीक्षेची अशी व्यसन युवकांनी केली पाहिजे व आपले जीवन घडविले पाहिजे असे मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ सुनील जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी बापू डॉक्टर घोक्षे डॉ वंदन जाधव प्रकाश नाईकवाडे कनिष्ठ विभाग प्रमुख प्राध्यापक सतीश जरांगे सर यांनी सहकार्य केले या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गेल्या सात दिवसात विविध कार्यक्रमाचे आयोजन करून व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात आले कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

### मूकबधिर शाळा नेकनूर येथे

घेत त्यांनी सर्वांना समान हक्क मिळावे यासाठी प्रयत्न केले.बहुजन समाजाला शिक्षणाची संधी मिळावी म्हणून त्यांनी अनेक शाळा सुरू केल्या. महिला शिक्षणालाही त्यांनी प्रोत्साहन दिले. अशाप्रकारे राजश्री शाहू महाराज यांचे कार्य आपल्या मनोगत मधून श्री तांबिले सर व श्रीमती खराटे मॅडम यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री राखुंडे सर यांनी केले.सूत्रसंचालन श्रीमती खरंगुळे मॅडम, कार्यक्रमाचे आभार श्री गिराम सर यांनी मानले. तसेच मूकबधिर शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

### ज्ञानोबा तुकारामचा जयघोष

पूजा आरती होऊन पायी दिंडीचे प्रस्थान होऊन पायी दिंडीचे पिंपळवंडी येथे सकाळी ११ वाजता श्री.हनुमान मंदिर परिसरात आगमन झाले.पायी दिंडीसह महंत महादेवानंद भारती महाराज,ह.भ.प.परमानंद भारती महाराज,ह.भ.प.शिवानंद भारती महाराज,ह.भ.प.भरत महाराज यांचे आमदार सुरेश धस तसेच ग्रामस्थ भक्तजनांच्या वतीने भव्य स्वागत करण्यात येऊन वारकऱ्यांना चहा व नाश्ता देण्यात आला.पिंपळवंडी येथून पायी दिंडी धोपटवाडी,कुसळंब,वांजरा फाटा,सौताडा,जामखेड, धोंडपारगाव,पोथरे,करमाळा, कुंभजफाटा,जेऊर,श्री आदिनाथ कारखाना,बिटरगाव,टेंभुर्णी,करकम मार्गे दि.४ जुलै २०२५ शुक्रवार रोजी पंढरपूर येथील महादेवानंद भारती बाबा मठ शेगाव दुमाला येथे पोहोचणार आहे.तसेच पायी दिंडीत सहभागी झालेल्या भाविक-भक्त, वारकऱ्यांना वारीच्या वाटेमध्ये ठिकठिकाणी नाष्टा,जेवणाची व मुक्कामाच्या ठिकाणी निवासाची व्यवस्था केलेली आहे.या पायी दिंडी सोहळ्यात ह.भ.प.परमानंद भारती महाराज,ह.भ.प.शिवानंद भारती महाराज,ह.भ.प.भरत महाराज,ह.भ.प.नारायण बजगुडे महाराज सहभागी झाले आहेत.या दिंडी सोहळ्याला मार्गस्थ पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी आमदार सुरेश धस,युवा नेते भाऊसाहेब भवर,सरपंच निलेश मोरे, उपसरपंच दादा पवार,माजी सभापती रामकिसन भोंडवे,उद्धवशेठ पवार,गोविंद गाडे आदीसह पंचक्रोशीतील सामाजिक,राजकीय,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरासह भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माजी नगरसेवक प्रेमदास

२०२० रोजी सुनावण्यात आली.त्यानंतर आरोपीने सदर निकालाच्या नाराजीने अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव, यांच्या न्यायालयात अपील दाखल केले सदर अपीलामध्ये सरकारपक्ष व आरोपीचे वतीने अंतीम युक्तीवाद केल्यानंतर श्रीमती राजेश्री पि. परदेशी मॅडम, अतिरिक्त सत्र न्यायाधिश माजलगांव यांनी सदर आरोपीची सबळ पुराव्याअभावी व आरोपीच्या वकीलांचा अंतिम युक्तीवाद ग्राह्य धरुन प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वडवणी यांनी दिलेली शिक्षा रद्द करून आरोपीची निर्दोष मुक्तता केली.सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने जेष्ठ विधीज्ञ श्री.व्ही.बी.लवटे, ॲड.एल.बी.गवते यांनी काम पाहिले व त्यांना ॲड.एस. डी.लंगे,ॲड.व्ही. एन.जुजगर,ॲड. जी.जी.वरपे यांनी सहकार्य केले.

# उत्तर प्रदेशमधील सिंगणा येथे आंतरराष्ट्रीय बटाटा केंद्राला मंत्रिमंडळाची मजूरी

पाटणा / वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशातील आग्रा जिल्ह्यातील सिंगणा गावात आंतरराष्ट्रीय बटाटा केंद्रांतर्गत दक्षिण आशियासाठी प्रादेशिक केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. २५ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले . केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण विभागाने हा प्रस्ताव सादर केला होता.

या प्रादेशिक केंद्राची स्थापना करण्यामागचा मुख्य उद्देश, देशात अन्न आणि पोषण सुरक्षेत वाढ करणं, शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणं आणि कृषी क्षेत्राशी निगडित विविध टप्प्यांमध्ये रोजगार निर्मितीला चालना देणं हा आहे. बटाटा आणि रताळा ही कंदपिकं भारतात मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. या पिकांमध्ये पोषणमूल्य असल्यानं महत्त्वाची पिकं मानली जातात. त्यामुळे या पिकांच्या मूल्यवर्धनावर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. या केंद्रातून उत्पादन क्षमता, प्रक्रिया व्यवस्थापन,



मूल्यवर्धन, पॅकेजिंग आणि विपणन यासारख्या बाबींमध्ये सुधारणा करून शेतकऱ्यांना थेट फायदा मिळेल, असा दावा केंद्र सरकारने केला आहे. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा बटाटा उत्पादक देश आहे. देशात दरवर्षी सुमारे ५५५८ दशलक्ष टन बटाट्याचं उत्पादन घेतलं जातं. यामध्ये सर्वाधिक बटाटा उत्पादन उत्तर प्रदेश राज्यात होतं. उत्तर प्रदेशमधील बटाटा उत्पादन देशाच्या एकूण उत्पादनाच्या सुमारे ३० ते ३५ टक्के आहे. त्याखालोखाल पश्चिम बंगाल, बिहार, पंजाब, आणि गुजरात ही राज्यं बटाटा उत्पादनात आघाडीवर आहेत. या केंद्राच्या माध्यमातून बटाटा आणि रताळ्याच्या अधिक उत्पादनक्षम, पोषणमूल्य असलेल्या आणि हवामान बदलाला तोंड देणाऱ्या वाणांची निर्मिती व प्रसार केला जाईल. या वाणांचा उपयोग भारतासह संपूर्ण दक्षिण आशिया क्षेत्रात होणार आहे. त्यामुळे या क्षेत्राचा शाश्वत विकास घडवण्यासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास कृषी मंत्रालयाने व्यक्त केला आहे. तसेच, जागतिक दर्जाचं कृषी संशोधन आणि नवप्रवर्तन यालाही या केंद्रामार्फत चालना दिली जाईल. हे केंद्र केवळ एका जिल्ह्यापुरतं मर्यादित न राहता, ग्रामीण अर्थव्यवस्थेपासून खाद्य प्रक्रिया उद्योगांपर्यंत अनेक पातळ्यांवर सकारात्मक परिणाम करणार आहे. त्यामुळे भारताचा कृषी क्षेत्रातील जागतिक सहभागही वाढेल, आणि स्थानिक ते आंतरराष्ट्रीय स्तरावर 'भारतीय बटाटा आणि रताळा संशोधन' ओळख निर्माण करेल, असा केंद्र सरकारचा दावा आहे.

## मेंढ्यांना हगलू आणि चिकड या आजारांपासून वाचवा



मेंढीपालन हा ग्रामीण भारतात शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर पूरक व्यवसाय मानला जातो. विशेषतः कोरडवाहू भागांमध्ये, जिथे शेतीला पाणी किंवा उत्पन्नाचा ठोस आधार मिळत नाही, तिथे मेंढीपालन हा एक खात्रीशीर उत्पन्नाचा स्रोत ठरतो. या व्यवसायात प्रामुख्याने लोकर, शेणखत आणि विशेषतः मांस विक्रीतून आर्थिक फायदा होतो. मात्र, या व्यवसायात खऱ्या अर्थाने नफा मिळवायचा असेल, तर मेंढ्यांबरोबरच त्यांच्या पिल्लांचे (मेमणांचे) आरोग्य जपणे अत्यावश्यक असते. दरवर्षी मेंढी सरासरी ३ ते ६ पिल्लांना जन्म देते. या पिल्लांपैकी बहुसंख्य पिल्ले निरोगी राहिली आणि जिवंत राहिली, तरच शेतकऱ्याला मोठा नफा मिळू शकतो. मात्र, काही गंभीर आजारांमुळे लहान वयातच मेमण्यांमध्ये मृत्यूचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढते. यातील प्रमुख आजार म्हणजे हगलू आणि चिकड हे आहेत, जे संपूर्ण कळपात काही दिवसांत पसरून मोठे नुकसान करू शकतात.

हगलू रोग आणि उपचार : हगलू म्हणजेच एंटेरोटॉक्सिमिया हा एक जीवाणूजन्य रोग आहे, जो नावाच्या बॅक्टेरियामुळे होतो. हे जीवाणू मेंढ्यांच्या आतड्यांमध्ये नैसर्गिकरित्या असतात, पण कधी कधी अन्नपचनात बदल झाला, मेंढ्यांनी अतिप्रमाणात भरपूर चारा खाल्ला किंवा आहारात अचानक मोठा बदल झाला, तर हे बॅक्टेरिया विषारी तत्त्व तयार करतात. या विषामुळे मेंढ्यांच्या शरीरात तीव्र त्रास होतो. त्यांना पोटात गाठी तयार होतात, अन्न खाणं बंद होतं, अंग थरथरतं, चक्कर येतात, काही वेळेस तोंडातून फेस आणि रक्तमिश्रित जुलाब होतो. जर वेळेवर उपचार झाले नाहीत, तर काही तासांत मृत्यूही होतो. लहान वयातील पिल्लांमध्ये या रोगाचा धोका सर्वाधिक असतो, कारण त्यांची रोगप्रतिकारक शक्ती विकसित झालेली नसते. हगलू रोग टाळण्यासाठी सर्वात प्रभावी उपाय म्हणजे दरवर्षी एकदा लसीकरण करणं. त्याशिवाय आहारात बदल करताना सावधगिरी बाळगावी, तसेच चाऱ्याचं प्रमाण नियंत्रित असावं. पिल्लांमध्ये पाण्याची कमतरता झाली असेल तर नमक-साखर युक्त घोळ द्यावा, आणि कृमीच्या नियंत्रणासाठी नियमित औषधोपचार करावेत.

चिकड आजार आणि उपचार : दुसरा आजार म्हणजे चिकड. हा रोग नावाच्या बॅक्टेरियामुळे होतो. चिकड हा खुरांचा आजार असून, पावसाळ्यात, दमट हवामानात आणि अस्वच्छता असलेल्या ठिकाणी हा आजार जलदगतीने पसरतो. या रोगात मेंढ्यांच्या खुरामधील त्वचा कुजते, लालसर होते, घाण येते आणि त्यामुळे जनावर लंगडायला लागतं. खुर फाटतात आणि जनावर हालचालही करू शकत नाही. या आजाराचा संसर्ग जमिनीवरून किंवा इतर आजारी मेंढ्यांशी संपर्क आल्यास होतो. संपूर्ण कळपात एका संक्रमित मेंढीमुळे आजार पसरतो. चिकडचा प्रतिबंध करण्यासाठी आजारी मेंढ्यांना वेगळं ठेवा, त्यांच्या खुरांची नीट स्वच्छता ठेवा. कधीकधी कापर सल्फेटच्या द्रावणात खुर धुतल्यास संक्रमण कमी होतं. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार अँटीबायोटिक मलहम आणि इंजेक्शन वापरणं अत्यावश्यक असतं. गोठा आणि चराईची जागा नेहमी कोरडी, स्वच्छ आणि जीवाणुरहित ठेवावी.

या दोन्ही रोगांमुळे मेंढ्यांच्या वाढीवर, मांसाच्या गुणवत्तेवर आणि उत्पादन क्षमतेवर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी सतत निरीक्षण, योग्य वेळेवर लसीकरण, गोठ्याची स्वच्छता, योग्य आहार नियोजन आणि डॉक्टरांचा सल्ला यावर भर दिला पाहिजे.

## सकस चाऱ्यासाठी सुबाभूळ, मारवेल

सुबाभूळ :लागवड १० बाय ७ फूट अंतरावर केली जाते. त्यामुळे दहा गुंठे क्षेत्रात सुमारे १५० ते १९० रोपे लागतात. थेट बियाणे पेरून किंवा रुजवून तयार केलेल्या रोपांद्वारे लागवड करता येते. बीज लागवडीपूर्वी ६० अंश सेल्सिअस गरम पाण्यात रात्रभर भिजत ठेवावे. के-३४१, के-६३६, के-८, वंडरग्रेज, तारांबा, निर्बिजा या सुधारित जातींचा वापर करावा.

मेथी घास :प्रामुख्याने हिवाळ्यात लागवड केली जाते; जुलैऑगस्ट मध्ये सुद्धा शक्य असते. लागवडीसाठी ३० बाय १० सें.मी. अंतर योग्य आहे. सिरसा - ९, आनंद, सीओ-१, आयजीएफआरआय-एस-२४४ या उत्तम जाती आहेत, तर टी-१ आणि आरएल-८८ या क्षारपड जमिनीसाठी शिफारस केलेल्या प्रजाती आहेत. ५०० चौ.मी. क्षेत्रासाठी सुमारे ५०० ते ६०० ग्रॅम बी लागते.

मारवेल :गवत बीज १:५ या प्रमाणात बारीक वाळूसोबत मिसळून पेरणी अथवा खड्ड्यांमध्ये टोकण करावी. छाटणीद्वारे लागवड करताना २ ते ३ डोळे असलेली मजबूत काडी घेऊन आयबीए मध्ये बुडवावी. पर्यायाने ४०ते ४५ दिवसांचे रोपे किंवा मूळ खोडांचे टोक वापरता येतात. लागवडीसाठी ४० सेंमी, ५० ३० सेंमी किंवा ९० ४५ सेंमी अंतर ठेवावे. ५०० चौ.मी.साठी सुमारे ३०० ते ४०० ग्रॅम बियाणे लागते. जून,जुलैमध्ये ओळीने पेरणी करावी. साधारणतः १८०० ते २००० मूळ खोडांचे तुकडे लागतात. - लागवडीसाठी जेएचडी-२, फुले मारवेल ०६-४०, फुले मारवेल-१ या जातींची निवड करावी. दहा गुंठे क्षेत्रासाठी पेरणीपूर्वी २ टन शेणखत, तसेच पेरणीवेळी ५ किलो नत्र, १५ किलो स्फुरद व ७.५ किलो पालाश द्यावे. कोरडवाहू भागात जून अखेरपर्यंत पेरणी पूर्ण करावी.

पाणी व्यवस्थापन :मारवेल गवताला प्रत्येक १५ दिवसांनी ठिबक सिंचनाद्वारे ८ तास सिंचन करावे.उन्हाळयामध्ये मेथी गवतासाठी आठवड्यातून एकदा तरी सिंचन आवश्यक असते. सुबाभूळ, मारवेल गवत कमी पाण्यामध्ये देखील तग काढू शकते. अत्यल्प पाणीसाठा असलेल्या भागात महिन्यातून एकदा तरी सिंचन करावे.

कापणी :मारवेल गवत: लागवडीनंतर ६० दिवसांनी १० सेंमीवर कापणी करावी. पावसावर आधारित भागात सप्टेंबर व नोव्हेंबरमध्ये दोनदा कापणी करून २० ते २५ टन/हे. हिरवा चारा मिळतो.मेथी घास : पेरणीनंतर ५० ते ६० दिवसांनी १० सेंमीवर कापणी करावी, नंतर ४० दिवसांनी पुन्हा कापणी करावी. एका हंगामात ६ते ८ वेळा कापणी शक्य.

सुबाभूळ: लागवडीनंतर ५ ते ६ महिन्यानंतर प्रथम जमिनीपासून १०० सेंमी उंचीवर तिरपा काप देवून छाटणी करावी. त्यानंतर दर ५० ते ६० दिवसांनी छाटणी करावी. कमी पावसाच्या भागात वर्षात तीन वेळा, ९० ते १०० दिवसांच्या अंतराने छाटणी करावी.

व्यवस्थापन :सुरूवातीच्या ३० ते ४५ दिवसांनी आणि ८०ते ९० दिवसांनी तण नियंत्रण करावे. गरज भासल्यास अधिक वेळा तण काढणी करावी. ताज्या सुबाभूळ पानांमध्ये मायमोसीन हे विषारी द्रव्य असते, जे जनावरांमध्ये अतिसार व केसगळती निर्माण करते. याचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी हिरवा चारा किमान ३०ते ६० मिनिटे सावलीत ठेवावा आणि मग जनावरांना खाऊ घालावा.

उत्पादन :दहा गुंठ्यांच्या या चारा उत्पादन पद्धतीमधून विविध घटकांद्वारे एकूण सुमारे ८ ते ९ टन प्रति वर्ष हिरवा चारा मिळतो. सुबाभूळ या घटकातून पहिल्या काही वर्षांत अंदाजे १.५ ते २.० टन प्रति वर्ष हिरवा चारा उत्पादन देते. मेथीघास सुमारे ५०० चौ.मी. क्षेत्रावर लागवड केल्यास ६ ते ८ कापणीतून ३.५ ते ४ टन प्रति वर्ष उत्पादन मिळते. मारवेल गवतापासून ५०० चौ.मी. क्षेत्रावर सिंचनाच्या उपलब्धतेनुसार २ ते २.५ टन प्रति वर्ष हिरवा चारा उत्पादन मिळते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९३ : लंडनमध्ये पहिले महिला मासिक द लेडीज मर्क्युरी प्रकाशित केले गेले.
१९५० : अमेरिकेने कोरियन युद्धात आपले सैन्य पाठवण्याचा निर्णय घेतला.
१९५४ : अणुशक्तीवर चालणारे जगातील पहिले विद्युतकेंद्र (क्षमता: ५००० किलो वॅट) रशियातील मॉस्कोजवळ ओबनिन्स्क येथे सुरू झाले.
१९६४ : साली दिल्ली येथील तीन मूर्तिच्या भवनामध्ये भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे संग्रहालय बनवण्याचा निर्णय घेण्यात आला.
१९६७ : लंडनजवळ एन्फिल्ड येथे जगातील पहिले ए.टी.एम. सुरू.
१९७७ : जिबुटी ला (फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९९१ : युगोस्लाव्हियाने स्लोव्हेनियावर आक्रमण केले.
१९९६ : अर्थतज्ञ द. रा. पेंडसे यांना 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चा 'चिंतामणराव देशमुख पुरस्कार' जाहीर
१९८१ : कंबोडियाने संविधान स्वीकारले.
२००२ : परमाणु शस्त्र नष्ट करण्याच्या रशियाच्या योजनेस जी-८ देशांनी आपली सहमती दर्शविली.
२००८ : साली मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष बिल गेट्स यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
२०१५ : साली संयुक्त राष्ट्र संघाने भारतीय चित्रपटाच्या इतिहासात विशेष स्थान असणार्या सत्यजित रे यांचे चित्र प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४६२ : लुई (बारावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ जानेवारी १५१५)
१५५० : चार्ल्स (नववा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ३० मे १५७४)
१८३८ : बंकिमचंद्र चट्टोपाध्याय बंगाली कादंबरीकार, कवी, लेखक आणि पत्रकार. त्यांनी लिहिलेल्या 'आनंदमठ' या कादंबरीत 'वंदे मातरम' हे गीत असून या गीताने स्वातंत्र्यलढ्यातील सहभागींना प्रेरणा मिळाली. (मृत्यू: ८ एप्रिल १८९४)
१८६४ : शिवराम महादेव परांजपे 'काळ' कर्ते, विद्वान, वक्ते, लेखक, स्वातंत्र्यसैनिक व पत्रकार (मृत्यू: २७ सप्टेंबर १९२९)
१८६९ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन प्राणीशास्त्रज्ञ हॅन्स स्पेमन यांचा जन्म.
१८७५ : दत्तात्रेय कोंडो घाटे ऊर्फ 'कवी दत्त' (मृत्यू: १३ मार्च १८९९)
१८८० : हेलन केलर अंध व मूकबधीर असुनही कला शाखेची पदवी मिळवलेल्या पहिल्या व्यक्ती, समाजसेविका, राजकीय कार्यकर्त्या व शिक्षिका (मृत्यू: १ जून १९६८)
१८९९ : पॅन अमेरिकन वर्ल्ड एअरवेज चे स्थापक जुआन पेप्पे यांचा जन्म. (मृत्यू: ३ एप्रिल १९८१)
१९१७ : खंडेराव मोरेश्वर ऊर्फ 'खंडू' रांगणेकर आक्रमक डावखुरे फलंदाज (मृत्यू: ११ आक्टोबर १९८४)
१९२२ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय तामिळ भाषिक लेखक, कादंबरीकार, लघुकथा लेखक, पत्रकार, व्यंगचित्रकार, प्रवासी लेखक, नाटककार आणि पटकथा लेखक अकिलन यांचा जन्मदिन.
१९३९ : राहूलदेव बर्मन तथा 'पंचमदा' संगीतकार (मृत्यू: ४ जानेवारी १९९४)
१९६२ : भारतीय-कॅनडातील उद्योगपती सुनंदा पुष्कर यांचा जन्म. (मृत्यू: १७ जानेवारी २०१४)
१९६४: साली पद्मश्री आणि अर्जुन पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट सेवानिवृत्त भारतीय धावपटू पी. टी. उषा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७०८ : धनाजी जाधव मराठा साम्राज्यातील सेनापती (जन्म: १६५०)
१८३९ : महाराजा रणजितसिंग शिख साम्राज्याचे संस्थापक (जन्म: १३ नोव्हेंबर १७८०)
१९५७ : हर्मन बुहल फ्रिट्झ विंटरस्टेलर, मार्कस श्मक, कर्ट डिमबर्गर यांच्या सोबत ब्रॉड शिखर पहिल्यांदा चढणारे ऑस्टीयन गिर्यारोहक (जन्म: २१ सप्टेंबर १९२४)
१९९६ : अल्बर्ट आर. ब्रोकोली 'जेम्स बाँड' पटांचे निर्माते (जन्म: ५ एप्रिल १९०९)
१९९८ : होमी जे. एच. तल्यारखान गांधीवादी नेते, सिक्कीमचे पहिले राज्यपाल, मंत्री व आमदार (जन्म: ९ फेब्रुवारी १९१७)
२००० : द. न. गोखले शिक्षणतज्ञ व चरित्रकार (जन्म: )
२००२ : भारतीय उपराष्ट्रपती कृष्णकांत यांचे निधन.
२००८ : फील्ड मार्शल सॅम माणेकशा (जन्म: ३ एप्रिल १९१४)

## मका पिकावरील अमेरिकन लष्कर आळीवर उपाययोजना

मकावर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी मोठी चिंता बनली आहे. विशेषतः मराठवाड्यात मका हे पीक पावसावर आधारित असल्याने आणि उत्पादन खर्च तुलनेने कमी असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी कपाशीऐवजी मका घेतले. मात्र, अलीकडेच छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील मका शेतात या धोकादायक अळीचा प्रादुर्भाव आढळून आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ही अळी मका पिकासाठी अतिशय घातक असून, ती लहान अवस्थेतील मका झपाट्याने नष्ट करू शकते.

ही अळी पानांच्या मध्यवर्ती भागातून सुरुवात करून संपूर्ण झाडाचा फडशा पाडते. तिच्या हल्ल्यामुळे झाडांचे मुख्य शेंडे खाल्ले जातात, ज्यामुळे झाडाची वाढ थांबते आणि धारण केलेले पाणी व अन्नद्रव्यांचा वापर निष्फळ ठरतो. ही अळी लपून राहण्याची क्षमता असलेली असल्यामुळे ती लवकर लक्षात येत नाही आणि एकदा वाढ झाली की मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. विशेष म्हणजे, ही अळी गरम आणि आर्द्र हवामानात अधिक वेगाने फोफावते. त्यामुळे पावसाळ्याच्या सुरुवातीला तिचा प्रादुर्भाव अधिक गंभीर असतो. सध्या मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांत मका पिकाची पेरणी मोठ्या प्रमाणात झाली आहे. विशेषतः छत्रपती संभाजीनगरमध्ये सुमारे १.८५ लाख हेक्टर क्षेत्रावर मका लागवड झाली आहे, तर जालना, बीड, धाराशिव आदी जिल्ह्यांतही हे क्षेत्र लक्षणीय आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव संपूर्ण मका पट्ट्यात पसरू शकतो. अळीच्या प्रादुर्भावामुळे मका उत्पादनात ३० ते ६० टक्केपर्यंत घट येण्याचा धोका असतो, जो शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी अत्यंत घातक आहे. या संकटावर नियंत्रण मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी काही उपाय तत्काळ राबवणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, पेरणीनंतर १० ते २५ दिवसांदरम्यान नियमितपणे मका शेताची पाहणी करावी. अळी आढळल्यास ती वेचून नष्ट करावी. लहान व कोवळ्या अवस्थेतील झाडांवर अळी लपून बसते, म्हणून शेंडे भागात विशेष लक्ष द्यावे. जैविक उपाय म्हणून ट्रायकोग्रामा प्रीटिओसम या परजीवी कीटकाचे सोडणे फायदेशीर ठरते. याशिवाय जैविक कीटकनाशकांचा वापर करावा. रासायनिक उपायांमध्ये, एमामेक्टिन बेन्झोएट ५% एसजी (५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी), स्पायनेटोराम ११.७% एससी (८० मिली प्रति १० लिटर पाणी) यासारख्या कीटकनाशकांचा वापर प्रभावी ठरतो. फवारणी करताना सकाळी किंवा संध्याकाळी करावी, जेणेकरून फवारणीचा परिणाम जास्त होतो. फेरोमोन सापळे लावल्यास अळीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवता येते. या अळीचा प्रसार थांबवण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन तंत्र वापरणे अत्यावश्यक आहे. यात शेतातील विविध जैविक, यांत्रिक व रासायनिक उपाय एकत्र करून वापर केल्यास लष्करी अळीचा प्रादुर्भाव रोखता येतो. या संकटावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळ वाया न घालवता वैज्ञानिक सल्ल्याचा अवलंब करावा आणि पीक वाचवण्यासाठी त्वरित कृती करावी.



# पशुवैद्यकीय दवाखान्याच्या ६४ इमारतींचे काम रखडले

## १३६ इमारतींना मंजुरी तर ६४ इमारतींसाठी उद्घाटनाची कुदळही नाही उपचार करायचे कुठे? पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी लक्ष घालण्याची मागणी

बीड। प्रतिनिधी

शेती व्यवसायात यांत्रिकीकरण झाले असले तरी आजही बहुतांश शेतकरी जनावरांच्या जीवावर शेती करतात. शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या उपचारासाठी सुसज्ज,औषधांचा पुरेसा साठा व सोयीसुविधायुक्त ईमारतीसह कर्तव्यदक्ष पशुधन विकास अधिकारी व पशुवैद्यकीय आधिका-यांची नितांत आवश्यकता असते.जिल्हा परीषदेकडील पशुवैद्यकीय दवाखाने, प्रथमोपचार केंद्र बांधण्यासाठी मागील वर्षी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या बीड जिल्ह्यात १७ मंजुर ईमारतीपैकी अर्ध्यापेक्षा जास्त १० ईमारतींची कामे रखडलेली आहेत तर सन २०२५-२६ मध्ये सरकार येऊन ६ महिने उलटले तरी नव्याने एकही ईमारत मंजुर केलेली नाही कि त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. मराठवाड्यात १३६ इमारती मंजूर करण्यात आल्या होत्या.दरम्यान जुन्या इमारती



नविन बांधकामासाठी पाडण्यातही आल्या परंतु यातील ६४ इमारतींसाठी अद्याप उद्घाटनाची कुदळही मारण्यात आलेली नाही.परीणामी जनावरांवर उपचार करायचे कोठे? असा सवाल यानिमित्ताने पशुधन मालक विचारत असुन पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी याप्रकरणी लक्ष देऊन रखडलेल्या इमारतींचे काम मार्गी लावावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

जनावरांवर उपचार करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाने येतात.जिल्हा परीषदेकडुन जिल्हा वार्षिक योजनेतुन पशू वैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो.गतवर्षी मराठवाड्यातील ८ जिल्ह्यात १३६ इमारती मंजुर करण्यात आल्या होत्या.यात सर्वाधिक धाराशिव ४२ तर सर्वात कमी हिंगोली ०३ जिल्ह्यात मंजुर आहेत. पशुवैद्यकीय दवाखान्यांना इमारती उपलब्ध झाल्यास त्याठिकाणी जनावरांवर विविध उपचारासाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देता येतात.गतवर्षी इमारतींना मंजुरी दिल्यानंतर कार्यारंभ आदेश झाले.दरम्यान जुन्या इमारती पाडण्यात आल्या.त्याठीकाणी नविन इमारत बांधकाम होणार असल्याने पशुपालन खुष होते परंतु पुढे मंजूर असलेले १३६ पैकी ६४ ठिकाणी अद्याप उद्घाटनाची कुदळही मारण्यात आलेली नाही.पशुवैद्यकीय दवाखाने इमारत बांधण्यासाठी १३६ कामांसाठी १३ कोटी १७ लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता.यात केवळ ५.५७ टक्के निधी खर्च झालेला असुन उर्वरित निधी अखर्चित आहे.सदरील निधी खर्च करून घेणे देखील जिल्हा परिषद यंत्रणेला जड जाताना दिसत आहे.सदरील निधी यावर्षी देखील खर्च होईल अशी शक्यता दिसत नाही.इमारतींना मंजुरी देऊन वर्ष उलटूनही कामे रखडलेली असली तरी ती पुर्ण करुन घेण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर म्हणावे तसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. जिल्हा परिषद यंत्रणा नेमकं करते तरी काय असा संतप्त सवाल उपस्थित करत पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी यात लक्ष घालून रखडलेल्या पशू वैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतींचे काम मार्गी लावावे अशी मागणी केली आहे.

# आदित्य कृषी महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची एसबीआय बँकेत निवड

## आदित्य महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षेच्या क्लासेसमुळे सौरभ डोमळे, राजप्रकाश वक्ते यांची निवड

बीड । प्रतिनिधी

शिक्षणाच्या क्षेत्रात ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन आणि उज्ज्वल भविष्य घडविण्याच्या उद्देशानेआदित्य कृषी महाविद्यालयात नाविन्यपूर्व शिक्षण दिले जाते. महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून स्पर्धा परिक्षेची तयारी करून घेतली जाते. यामुळे अनेक विद्यार्थी स्पर्धा परिक्षा देवून यश मिळवत आहेत. महाविद्यालयाचे विद्यार्थी राजप्रकाश वक्ते आणि सौरभ डोमळ यांची स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये ज्युनिअर असोसिएट या पदावर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षेतून निवड झाली आहे.राजप्रकाश आणि सौरभ या दोघांनी २०१९ ते २०२३ या कालावधीत आदित्य कृषी महाविद्यालयात आपले पदवी शिक्षण पूर्ण केले.

संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी परिषद सदस्या व आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली येथील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर केवळ अभ्यासच नव्हे तर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्रे, तज्ञांचे व्याख्यान, कलागुणांना वाव देणारे विविध कार्यक्रम अयोजित केले जात आहेत. या कार्यक्रमात राजप्रकाश आणि सौरभ या दोघांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्याच्या या सहभागामुळे आज तो हे यश संपादन करू शकला आहे.

या यशाबद्दल डॉ. सातपुते डी.बी., डॉ. प्रसाद खेडकर, डॉ. निर्मला ठोके, प्रा. मिसाळ व्ही.एस., प्रा. गव्हाणे पी.आर. यांनी राजप्रकाश आणि सौरभ यांचे अभिनंदन केले. यशानंतर आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. श्याम भुतडा म्हणाले, गोरगरीब पार्श्वभूमीतून आलेला विद्यार्थी शासकीय सेवेत अधिकारी म्हणून पुढे जातो, हे आमच्यासाठी अत्यंत समाधानाची बाब आहे. आमच्या महाविद्यालयाचे ध्येय हेच आहे यशस्वी, सुसंस्कारित, सर्वांगीण विकास झालेला विद्यार्थी येथे घडतो. या यशाबद्दल वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी परिषद सदस्या व आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन करताना सांगितले, शहरी मुलांप्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही उत्तम संधी मिळायला हव्यात, यासाठी आमचा प्रयत्न असतो. राजप्रकाश याने मिळालेल्या संधीचे सोन केलं आणि तो आज शासकीय सेवेत रूजू होणार आहे. इतर विद्यार्थ्यांनीही महाविद्यालयात आयोजित केलेल्या प्रत्येक कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेवून यश मिळवावे.

**महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षेमुळे मी अधिकारी झालो**

आदित्य कृषी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर प्रथम वर्षापासूनच मी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्रे, तज्ञांचे व्याख्यान आणि आमच्या कलागुणांना वाव देणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला. येथील प्राध्यापकांच्या मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच आज मी बँकींग क्षेत्रात यशस्वी झालो

# गळ्यामध्ये टाळ घेऊन पंढरीची वारी करतोय पत्रकार वारकरी

## विजयकुमार गाडेकर यांची माऊलीच्या सोहळ्यामध्ये द्वितपस्फूर्ती

शिरूर। प्रतिनिधी

शंकर भालेकर : खांद्यावरती संसाराचा भार आणि तालुक्यावर पत्रकारितेची नजर ठेवून आपला प्रामाणिक पत्रकारितेचा पेशा सांभाळणारा पत्रकार गेल्या सहा दिवसापासून वारकरी संप्रदायाची भूषणे लेवून, गळ्यामध्ये टाळ घेऊन विठ्ठल नामाचा भजनामध्ये दंग होऊन माऊलीच्या सोहळ्यामध्ये पंढरीची वाट चालत आहे. माऊलीच्या सोहळ्यामध्ये आपली पायी पंढरीच्या वारीची द्वितपस्फूर्ती पूर्ण होत असल्याचा आनंद यावेळी वारकरी पत्रकाराच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे.

महाराष्ट्रातील भाविक-भक्तांना, वारकरी बांधवांना ज्येष्ठ महिना संपत आला की पंढरीच्या वारीचे वेध लागत असतात. पंढरपूरला जाऊन पिता विठ्ठलाचे व माता रुक्माईचे कधी दर्शन घेईल अशी ओढ त्याच्या मनामध्ये निर्माण होत असते.याप्रमाणे बीड जिल्ह्यातूनही लाखोंच्या संख्येने भाविक भक्त पायी पंढरीची वारी करतात. बीड जिल्ह्यातील कित्येक कुटुंबामध्ये गेल्या काही पिढ्यापासून पंढरीची वारी अखंड वारी असते. अशीच वारी शिरूर कासार तालुक्यातील पत्रकार विजयकुमार गाडेकर यांच्या गेल्या कुटुंबातही चालू आहे. या परंपरा विजयकुमार गाडेकर यांनी आजपर्यंत अविरतपणे चालवली आहे. अंगी असलेले वारकरी संप्रदायाची वेड, भजन कीर्तनाचा छंद जोपासून अध्यात्मिक कार्यक्रमाची आवड बाळगणारा पत्रकार म्हणून त्यांची शिरूर कासार तालुक्यामध्ये मोठी ओळख आहे. आपल्या घरामध्ये पंढरीची वारी आहे ही सांभाळणे आपल्याच खांद्यावरची जबाबदारी समजून गेल्या २४ वर्षापासून



विजयकुमार गाडेकर हे या वारीच्या पर्व काळामध्ये माऊलीच्या पालखी सोहळ्यामध्ये अगदी आळंदीपासूनच सहभागी होतात. प्रति वर्षाप्रमाणे याही पत्रकार विजयकुमार गाडेकर अगदी वारकरी सांप्रदायाचा पोशाख धारण करून, गळ्यामध्ये टाळ घेऊन विठ्ठल नामाच्या भजनामध्ये दंग होऊन पंढरीची वारी करत आहे. माऊलीच्या सोहळयातील प्रवासाचा आजचा हा सहावा दिवस असून सोहळ्यामध्ये पायी प्रवास करताना त्यांच्या चेहऱ्यावर एक विलक्षण आनंद पाहायला मिळत आहे. एकीकडे सोहळ्यातील भजनाचा आनंद तर दुसरीकडे याच सोहळ्यामध्ये आपली द्वितस्फूर्ती पूर्ण होत असल्याचा आनंद त्यांना आहे.

पत्रकारितेच्या माध्यमातून धार्मिक लिखाण

विजयकुमार गाडेकर हे शिरूर कासार तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार म्हणून ओळखले जातात. गाडेकर हे एका विभागीय दैनिकांमध्ये तालुका प्रतिनिधी म्हणून काम करत असून सामाजिक राजकीय क्षेत्रातील घडामोडीवर त्यांचे विशेष भर असतो त्याचबरोबर तालुकाभरामध्ये होणारे धार्मिक कार्यक्रम त्यांच्या लेखणीतून कधीही चुकत नाहीत. यामुळे पत्रकारिते मध्ये परांगत असलेला पत्रकार सांप्रदायामध्ये समरस राहतो असे उदाहरण किंचितच पाहायला मिळतात.

आईकडून मिळाला वसा !

गाडेकर यांच्या मातोश्री सिताबाई रामचंद्र गाडेकर यांनी सात वर्ष माऊली सोबत संत महादेव कासार दिंडी क्र.१२५मधे पायी वारी केली वयोपरत्वे चालता येणे शक्य नव्हते म्हणून आपण पाच वर्ष वारी करून आईच्या भक्ती साधनेची एक तपपुर्ती पूर्ण होईल म्हणून सन २००२ पासून विजय कुमार यांनी सुरू केलेली वारी आईची तपस्फूर्ती तर करूनच केली मात्र स्वतःची ही आता द्वितस्फूर्ती करत आहे. जोपर्यंत शरीर चालते आणि ज्ञानेश्वर माऊली माझ्याकडून ही वारी करून घेतात तोपर्यंत सोहळ्यामध्ये वारी करणे चालूच राहील असे विजयकुमार गाडेकर यांनी सांगितले.

निष्काम प्रवचन सेवा..

विजयकुमार गाडेकर यांचे गुरू वै.भिमसिह महाराज भगवानगड यांची हस्तकृपा झाल्या पासुन ज्ञानेश्वरी पारायण व प्रवचन सेवा ते निष्काम भावनेतून करत आहेत. यामुळे त्यांची पत्रकार याबरोबरच महाराज म्हणून ही ओळख आहे .

## के.एस.पी विद्यालय येथे राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

दि.२६/०६/२०२५ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आला. या कार्यक्रमध्ये सौ. अंजलीताई शेळके, संस्थाध्यक्षा यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले व पुष्पहार अर्पण केले. या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत गोड शब्दात व्यक्त केले. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. अशा प्रकारे मुलांना अवगत करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, तसेच शाळेतील , प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त परळीत गुटख्याची होळी

## सामाजिक जनजागृतीसाठी अनोखा उपक्रम

परळी । प्रतिनिधी

जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून गुरुवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी परळी बस स्टॅन्ड समोर अंमली पदार्थांविरोधात जनजागृतीचा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या ॲड. मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने विविध प्रकारच्या गुटख्याची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. या प्रसंगी ॲड. मनोज संकाये यांच्या हस्ते गुटखा व अन्य व्यसनात्मक पदार्थांची होळी करून उपस्थित कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा देत समाजात संदेश दिला ''नको अंमली पदार्थांची नशा, आयुष्याची होईल दुर्देशा'', ''व्यसनांचा पाया मोडा, आयुष्य सुखांशी जोडा'', ''नको अंमली पदार्थांची नशा, आयुष्याची होईल दुर्देशा''या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये म्हणाले, ''अंमली पदार्थांचे व्यसन हा एक सामाजिक रोग झाला आहे. तरुण पिढी दारू, सिगारेट, तंबाखू आणि अंमली पदार्थांच्या विळख्यात सापडत असून त्याचे गंभीर दुष्परिणाम भोगत आहे. नशेच्या आहारी जाऊन अनेक तरुण गुन्हेगारीकडे वळत आहेत. हे चित्र बदलणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले की, तरुणांनी या व्यसनांपासून दूर राहून आपले आयुष्य समृद्ध, आरोग्यदायी व यशस्वी बनवावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.या कार्यक्रमास ॲड. मनोज संकाये मित्र मंडळाचे राम जोशी, दीपक शेटे ,मुंजाभाऊ साठे, संतोष पिसे ,एस चौधरी, मुंजाभाऊ गरड ,संतोष कांबळे ,प्रवीण रोडे ,वसंत मुंडे ,धनराज रोडे ,जयसिंग रोडे ,प्रमोद गिरी ,वैजनाथ कांदे ,श्रीहरी मुंडे ,बाळू मुंडे, नामदेव कराड ,एकनाथ मुंडे, वैजनाथ केंद्रे ,सुंदर आव्हाड, बाळू गुट्टे, सर्व पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे शहरात सर्वत्र स्वागत होत असून, अशा प्रकारच्या जनजागृती मोहिमा गरजेच्या असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त परळीमध्ये ॲड. मनोज संकाये मित्र मंडळाच्यावतीने गुटख्याची प्रतिकात्मक होळी करून समाजात जनजागृतीचा संदेश दिला.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. व्ही. डी. गिते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ९८७/२०२५**

**ॲड. बी. एन. तावरे**

**रुक्मीणबाई वि. निरंक**

अर्जदार :- १. रुक्मीणबाई भ्र. विठ्ठल उर्फ विठ्ठलराव शिंदे, वय-७५, वर्षे, धंदा-घरकाम, रा. नेकनुर, ता. जि. बीड

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कौशल्या पि. विठ्ठलराव शिंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत कौशल्या पि. विठ्ठलराव शिंदे यांचा मृत्यु दिनांक १८.०४.२०२५ रोजी राहते घरी मौजे नेकनुर, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार ही मयताची आई आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरतु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत कौशल्या पि. विठ्ठलराव शिंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४ जुन २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६ ऑगस्ट २०२५०

आदेशावरुन,

स्वाक्षरित **क. लिपीक**

स्वाक्षरीत **अधिक्षक**

दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.



**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोद दावा प्रकरण अर्ज नं.१४१/२०२५**

**सत्यशिला मुरलीधर काशीद विरुद्ध ग्रा.पं: कार्या , साक्षळपिंप्री**

पहा : १) सत्यशिला मुरलीधर काशिद, रा. साक्षाळपिंप्री ता. जि.बीड उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यु नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक वैष्णवी मुरलीधर काशिद यांचा दिनांक ०३/१०/२००७ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबत मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न . प. कार्यालयस साक्षाळपिंप्री ता.बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यानी या न्यायालयात हजार राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्रि ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशात केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले सदर प्रकरणात पुढील तारीख ०८/०७/२०२५ ही आहे.

स्वाक्षरित **क. लिपीक**

स्वाक्षरीत **तहसिलदार, बीड**


# लिंबागणेश येथील गतिरोधकाचा प्रश्न मार्गी लागणार

## सचिन पांडकर, रवींद्र तोंडे, सुभाष सानप यांनी केली पाहणी

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मांजरसुंभा ते पाटोदा मार्गावरील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या अपघातप्रवण क्षेत्रात गतिरोधक बसवावेत या मागणीसाठी गेल्या ३-४ वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि



पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी वारंवार पुकारलेल्या आंदोलनाची प्रशासनाकडून अखेर दखल घेण्यात आली असुन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्हा सुरक्षा रस्ता समितीत हा विषय घेतल्यामुळे त्यांच्या आदेशाने दि.२६ गुरुवार रोजी सकाळी अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, रस्ता सुरक्षा समितीचे सचिव तथा बांधकाम विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे आणि वाहतूक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी लिंबागणेश येथे पाहणी केली. यावेळी डॉ.गणेश ढवळे, हरिओम क्षीरसागर, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे व शिक्षकवृंद उपस्थित होते. अतिरिक्त पोलिस अधीक्षक सचिन पांडकर व बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे,वाहतुक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी प्रत्यक्ष पाहणी करत संवाद साधत, सुचना फलक लावण्याच्या सुचना देत संबंधित कंत्राटदार आणि राष्ट्रीय महामार्ग आधिका-यांना लेखी पत्रकाद्वारे कळविण्यात येणार असल्याचे सांगितले.

गेल्या ३-४ वर्षांपासून डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी रास्तारोको, अपघातातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली आदी लक्ष्यवेधी आंदोलने करण्यात आली होती.तर. ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांनी दि.१६ जुन रोजी आत्मदहनाचा इशारा दिल्यानंतर कंत्राटदाराने तात्पुरता स्वरूपात रंबलिंग स्ट्रीप मारून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला होता.मात्र हरिओम क्षीरसागर यांनी त्याचा फारसा परिणाम होत नसल्याने गतिरोधकाची मागणी लावून धरत दि.२५ जुन रोजी ''आमदार आपल्या गावी, आपल्या दारी''विशेष मोहिमेंतर्गत आ. संदिप क्षीरसागर यांच्या कार्यक्रमात बेलगाव याठिकाणी गतिरोधकाचा मुद्दा लावून धरत पाठपुरावा केला.अखेर आज वरीष्ठ आधिका-यांनी पाहणी करत सकारात्मकता दर्शवली त्यामुळे गतिरोधकाचा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.


**टीसी हरवला आहे**

चि. उढान आदित्य प्रेमनंद यांचा जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय १२वी पास चा टीसी किनगाव चौफुली ते अंबड प्रवासादरम्यान हरवला आहे. कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क**

**७८२३८६२८६५**

# आश्रम शाळेच्या शिक्षकांचे कुटुंबासह उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील प्राथमिक आश्रम आश्रम शाळेतील शिक्षकांनी आपल्या विविध मागण्यासाठी पुन्हा उपोषण सुरू केले आहे. तीन दिवसापासून कुटुंबासह उपोषण सुरू आहे.**

राज्यात विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत वंचित विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी कै. वसंतराव नाईक माजी मुख्यमंत्री आश्रम शाळांना मान्यता देऊन वंचितांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केला आहे.

सद्यस्थितीत ज्ञानदान करण्यासाठी कार्यरत असलेल्या आश्रमशाळा शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना नाहक संस्थेच्या माध्यमातून मानसिक आणि आर्थिक त्रास देऊन पिळवणूक करत आहेत.प्रशासकीय सेवेत काम करणारे अधिकारी बड्या लोकप्रतिनिधींच्या धाकात राहुन नियमात असलेले काम टाळत आहेत.



या प्राथमिक आश्रम शाळा वडझरी ता. पाटोदा जि. बीड येथील कर्मचारी यांची संचमान्यता होण्यापूर्वी बीड जिल्ह्यातील अतिरिक्त कर्मचारी समायोजनाची प्रक्रिया पार पाडली आहे. परंतु वडझरी येथील अतिरिक्त कर्मचारी समायोजन नाही.कार्यरत असलेल्या कर्मचारी यांचे जाणीवपूर्वक वेतन दिले जात नाही. विवाह झालेल्या प्रवेश विद्यार्थिनीच्या नावाने परिपोषण दिले जाते.उपोषणाच्या माध्यमातून शासन दरबारी शिक्षकांना भ्रष्टाचाराचा पाढा वाचावा लागतो, हे दुर्दैव असल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघ. व मराठवाडा शिक्षक संघ. यांनी कर्मचाऱ्यांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा दिला आहे. सदर प्रकरणी तत्काळ तोडगा निघाला नाही, तर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनाच्या प्रती प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण मंत्रालय मुंबई, उपसचिव, इतर मागास बहुजन कल्याण मंत्रालय, मुंबई, कक्षाधिकारी, इतर मागास बहुजन कल्याण मंत्रालय मुंबई, संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजी नगर आदींना पाठविण्यात आल्या आहे.

## पायी चालणाऱ्या वारकऱ्यांची मोफत मालिश करणारा महेश मुरकुटे

आष्टी । प्रतिनिधी

आषाढी वारी काही दिवसांवर येऊन ठेपल्याने वारकरी आता पंढरीच्या दिशेने प्रस्थान करत आहेत मैल न मैल पायी चालून थकणाऱ्या वारकऱ्यांची मोफत मालिश करून सेवा देत त्यांच्या सेवेतच मला विठ्ठल भेटतो.आणि मी माणसांमध्येच देव पाहतो,'' अशी भावना ठेवत वारकऱ्यांची गेल्या ६ वर्षापासून सेवा करणारा महेश मुरकुटे हा युवक सर्वांचे लक्ष वेधत आहे.

वारकरी उन्हा-तान्हात सलग १५ ते २० दिवस चालत पंढरपूरला जातात.त्याचदरम्यान पायी चालताना येणारा थकवा



आणि त्रास हा दूर करण्यासाठी तसेच सेवाभावी वृत्ती मनात ठेऊन वारकऱ्यांची मालिश करून त्यांना पुढील प्रवासासाठी ठणठणीत पान ३ वर

## मुख्याधिकाऱ्याच्या मनमानी कारभारा- विरोधात सय्यद सलीमबापूंचा यलगार

### नगर परिषद कार्यालयासमोर भव्य रस्ता रोकोचा ईशारा

माजलगाव । प्रतिनिधी

नगर परिषदेमध्ये कार्यरत असलेले प्रशासक तथा मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांचा मनमानी कारभार सुरू आहे. जनतेची अनेक कामे खोळंबली आहेत.परंतु पालिका प्रशासन गेंड्याची कातडी पांघरून आहे.या धोरणाविरुद्ध समाजसेवक व आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी एल्गार पुकारला



आहे.संघटनेच्या वतीने वतीने दि.३० जुन २०२५ रोजी नगर परिषदेसमोर रास्ता रोको भरण्याचा इशारा दिला आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात नागरी समस्या संदर्भात मागण्या करण्यात आल्या आहेत.माजलगाव नगरपरिषद हद्दीमध्ये किरायदार, भोगवटदार,बेघर या गोरगरीब लोकांकडून यापूर्वी नगरपरिषद माजलगाव यांनी ऑनलाईन व ऑफलाईन दोन वेळेस घरकुलचे फॉर्म भरून घेतले आहेत.परंतु अद्यापपर्यंत गोरगरीब लोकांना घरकुल देण्यात आलेले नाही.याला मंजुरी देण्यात यावी.गरिबांना शहरात निवारा नाही त्यामुळे त्यांची बिकट अवस्था झालेली आहे. यासाठी घरकुलांची व्यवस्था करण्यात यावी.आझाद नगर येथे अर्धवट रस्ता तयार करण्यात आलेला आहे,तो पूर्ण करण्यात यावा.यामुळे तेथील लोकांची गैरसोय टळेल.तसेच सन २०२० ते २०२५ या वर्षात नगरपरिषद माजलगाव यांनी किती गुंठेवारी केल्या याची यादी देण्यात यावी.किती लोकांना ओपनस्पेच्या बोगस पिटीआर देण्यात आल्या याची माहिती देण्यात यावी.शहरात किती ओपनस्पेस,डीपीरोड आहेत याची माहिती देण्यात यावी.इत्यादी मागण्या करत नगरपरिषद हद्दीतील किरायदार,भोगवटदार बेघर या गोरगरीब लोकांना घरकुल वाटप न केल्यास आपल्या कार्यालयासमोर दि.३० जुन २०२५ रोजी भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल. याची नोद घेण्यात यावी,असा इशारा सय्यद सलीमबापू,एडवोकेट सय्यद अल्ताफ,आंबेडकर विचार मंचच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## मोठेवाडीत राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना अभिवादन



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात आरक्षणाचे प्रणेते दीन - शोषितांचे तारणहार थोर समाजसुधारक लोककल्याणकारी राजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन संभाजी चव्हाण,पत्रकार राजाभाऊ पास्टे, अंगदराव खेत्री,राहुल सुरवसे, गजानन गोंडे,गणेश सर्जे,प्रकाश शेळके,सोमेश्वर हिवरकर, हनुमान सर्जे, माऊली नावडकर, संजय रोकडे, प्रदीप खेत्री व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

## चांगल्या आरोग्यासाठी व्यसनमुक्त जीवन जगा -प्राचार्य सोमनाथ घाडगे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा. पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राजश्री शाहू महाराज जयंती व विद्यार्थ्यांना तंबाखूमुक्त शपथ देण्यात आली सर्वप्रथम राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवर सत्कार करण्यात आला यानंतर विद्यार्थ्यांना तंबाखू मुक्त व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व्यसनमुक्ती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे



अध्यक्ष महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य विश्वास कदम मार्गदर्शनाखाली प्र प्राचार्य सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून समाजशास्त्री विभागाचे विभाग प्रमुख डॉ सुनील जाधव न्याक समन्वय समितीचे प्रमुख प्राध्यापक विनोद किर्तन सर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते प्राचार्य पान ३ वर

## मूकबधिर शाळा नेकनूर येथे राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी



बीड । प्रतिनिधी

गुरुवार रोजी नेकनुर येथील मूकबधिर शाळेत राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली. आजच्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक श्री लुचारे सर तसेच कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तांबिले सर हे उपस्थित होते. राजर्षी शाहू महाराज हे एक थोर समाज सुधारक होते. त्यांनी आपल्या राज्यात शिक्षण आरोग्य आणि समाज सुधारण्यासाठी मोठे कार्य केले. अस्पृश्यतेच्या विरोधात ठाम भूमिका पान ३ वर

## माजी नगरसेवक प्रेमदास राठोड यांना दिलेली शिक्षा अपीलामध्ये रद्द

माजलगाव । प्रतिनिधी

पिडीत व्यक्ती ही वडवणी ता.वडवणी जि.बीड येथे घरी रात्री अंधार असल्याचा गैरफायदा घेवून प्रेमदास हा दि. २० नोव्हेंबर २०१८ रोजी रात्री ०२:०० ते ०३:०० वाजणेच्या दरम्यान घराची कडी वाजल्याचा आवाज आल्याने उठून घरातील लाईट चालु करून दरवाजा उघडताच प्रेमदास हा घरात घुसुन त्याने फिर्यादीचा उजवा हात वाईट हेतूने धरला व फिर्यादीस म्हणाला की तु मला खूप आवडतेस असे म्हणुन पिडीतेसोबत असभ्य वर्तन केल्याबद्दल पिडीतेने पो.स्टे. वडवणी येथे दिनांक २१ नोव्हेंबर २०१८ रोजी प्रेमदास सिताराम राठोड यांचे विरुध्द फिर्याद दाखल केली व सदर फिर्यादीनूसार आरोपी विरुध्द गु.रं.नं.२३५/२०१८ कलम ४५२,३५४,३५४(अ)(१)(२), ३५४(ड)(२) भा.द.वी. अन्वये गुन्हा दाखल केला. सदर



प्रकरणाचा तपास करून तपासी अंमलदार यांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वडवणी यांच्या न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.सदर प्रकरणांत सरकार पक्षाच्या वतीने एकूण ०४ (चार) साक्षीदार तपासण्यात आले व दोन्ही पक्षाच्यावतीने अंतीम युक्तीवाद ऐकल्यानंतर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वडवणी यांनी आरोपीस कलम भा.द.वी. ४५२ अन्वये दोन वर्षांची शिक्षा व ५०००, /- रुपये दंड आणि भा.द.वी.३५४ अन्वये एक वर्षाची शिक्षा व ३०००/- रुपये दंड दि.१४ जानेवारी पान ३ वर

## ज्ञानोबा तुकारामचा जयघोष करत श्री क्षेत्र अश्वत्थलिंगची दिंडी निघाली पंढरीच्या वाटे



### पायी दिंडी सोहळ्याच्या प्रस्थानप्रसंगी आ.सुरेश धस यांची उपस्थिती

पिंपळवंडी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह पंचक्रोशीतील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर संस्थानच्या पायी दिंडीचे श्री क्षेत्र अश्वत्थलिंग मंदिर येथून गुरुवारी दि.२६ रोजी श्री.स्वामी महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांच्या नेतृत्वाखाली पायी दिंडी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ झाला.हजारो भाविक-भक्त,वारकरी यांच्या उपस्थितीत टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा तुकारामाच्या जयघोषात दिंडीचे भक्तीमय वातावरणात प्रस्थान झाले.या पायी दिंडी सोहळ्यात वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

गुरुवार दि.२६ जून २०२५ रोजी सकाळी ९:३० वा.श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर,तसेच श्री गंगाभारती महाराज मठ येथे महंत गुरुवर्य ह.भ.प.श्री महादेवानंद भारती महाराज,ह.भ.प.परमानंद भारती महाराज,ह.भ.प.शिवानंद भारती महाराज यांच्या शुभहस्ते पान ३ वर

## यशाला परिस्थिती आडवी येत नाही- पोलीस उपअधीक्षक पुजा पवार

घाटनांदूर । प्रतिनिधी

यशस्वी होण्यासाठी परिस्थिती आडवी येत नसुन स्वत:वर विश्वास ठेवुन लक्षावर फोकस करा, असे प्रतिपादन पोलिस उपअधिक्षक पुजा पवार यांनी येथिल अमृतमहोत्सवी सोमेश्वर शैक्षणिक संकुलातील दहावी-बारावीमधील यशवंताचा सन्मानसोहळ्यात केले.

बहुजणांचे ज्ञानपीठ श्री सोमेश्वर शिक्षण संस्था, घाटनांदूर संचलित श्री सोमेश्वर विद्यालय-




मुलांचे, श्री सोमेश्वर ज्युनियर कॉलेज आणि श्री सोमेश्वर कन्या प्रशालेतील पंच्याऐंशी टक्के पेक्षा अधिक गुण घेवुन उत्तीर्ण झालेल्या दहावी-बारावी आणि एनएमएमएस मधुन चौदा लाख रुपये शिष्यवृत्तीचे मानकरी सत्तावीस यशवंतांचा सन्मान आई-वडीलांसह डॉक्युमेंट फाईल, पेढा व पुष्पगुच्छ देवुन पोलिस उपअधिक्षक पुजा पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल गोविंद महाराज केंद्रे यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे यावेळी निकालाचे खरे मानकरी विषय शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर संस्थाध्यक्ष डॉ.उध्दव शिंदे, संस्था सचिव पान ३ वर

## व्यसने तात्पुरते समाधान व अनंतकालीन वेदना देतात -डॉ.इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त समाधान मानसोपचार रुग्णालय व व्यसनमुक्ती केंद्र अंबाजोगाई येथे भव्य व्यसनमुक्ती शिबिर इनरव्हील क्लब अंबाजोगाई व समाधान व्यसनमुक्ती रुग्णालय तर्फे आयोजित करण्यात आले होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून समाधानी व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ राजेश इंगोले उपस्थित होते.

व्यसनमुक्ती शिबिरात मार्गदर्शन करताना डॉ राजेश इंगोले यांनी व्यसने ही माणसाला क्षणिक सुख समाधान देतात परंतु त्यामुळे जे मानसिक व शारीरिक दुष्परिणाम त्या व्यक्तीच्या शरीरावर मनावर होतात त्यामुळे त्या वेदना अनंतकालीन असतात.

त्यामुळे व्यसनी लोकांनी व्यसनापासून




स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे कोणतीही व्यसन जसे आपोआप व्यक्ती स्वीकारत नाही त्याला ते व्यसन जीवन जगताना वाईट विचारांमुळे वाईट प्रभावामुळे आणि परिस्थितीमुळे जडतात त्याचप्रमाणे जुडलेली व्यसने ही त्या व्यक्तीने जाणीवपूर्वक प्रयत्न केला तर हमखासरीत्या सुटू शकतात असे प्रतिपादन डॉक्टर राजेश इंगोले यांनी यावेळी केले. दारू, गांजा, कोकेन, ड्रग्स, तंबाखू ,गुटखा ,मादक द्रव्य, गुंगीच्या गोळ्या ,सोल्युशन ही व्यसने मानसिक आणि शारीरिक परावलंबित्व निर्माण करतात. त्यामुळे व्यसनी व्यक्तींना ही व्यसने केली नाही तर त्यांना शारीरिक लक्षणे व मानसिक लक्षणे यांचा त्रास व्हायला सुरू होतो. व्यसन नाही केल्यास थरथरी सुटणे, उलटी ,मळमळ होणे पोटात दुखणे डोके जड पडणे, घबराहट होणे, घाम येणे, छाती धडधड होणे, विविध प्रकारचे भास निर्माण होणे, अकल्पनीय विचार निर्माण होणे, भीती शंका निर्माण होणे ही लक्षणे येतात. यामुळे व्यसनी व्यक्तींना त्यांचे व्यसने ही त्यांना जीवन सुरळीत जगण्यासाठी आवश्यक वाटतात आणि ही व्यसन केली तरच माझी वरील लक्षणे कमी होतात असे त्याला वाटत राहते. त्यामुळे तो त्या व्यसनाच्या आहारी जाऊन व्यसनाधीन होतो. विविध मानसिक संशोधनाअंती असे सिद्ध झाले आहे की ज्याप्रमाणे व्यसने माणसाला जुळतात त्याचप्रमाणे ही व्यसने सोडविली पान ३ वर

## पाटोद्यात तालुका आरोग्य अधिकारी गैरहजर वरिष्ठांचे दुर्लक्ष; रुग्णांचे हाल

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा आरोग्य विभागातील असणारे तालुका आरोग्य अधिकारी हे सतत गैरहजर असून दि.२५ रोजी हे कार्यालयात गैरहजर आढळून आले असून यामध्ये बहुतांशी कंत्राटी कर्मचारी या ठिकाणी आढळले असून पाटोदा शहरात बुधवारी आपेगाव येथुन संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सोहळा येत असतो या सोहळ्यातही आरोग्य विभागाने हजेरी लावली नसल्याचे जाणवते तरी याची वरिष्ठांनी चौकशी करून तात्काळ कारवाई करावी अशी मागणी होत आहे... याबाबत अधिक माहिती अशी




की शासनाने पालखी मार्गावरील येणाऱ्या दिंडीतील भाविक भक्तांना अडचण येऊ नये त्याचप्रमाणे त्यांची तपासणी करणे यासाठी ज्या मार्गावरून पालखी जाते त्या मार्गावर असणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्र व संबंधित डॉक्टर यांना सूचना देऊनही पाटोदा शहरांमध्ये बुधवार रोजी आपेगाव येथुन आलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरीमध्ये डिलिव्हरी बॉयच्या हाताचा पंजा तोडणाऱ्या आरोपींना पुन्हा अटक

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड मधील थेरगाव येथे एका डिलिव्हरी बॉयवर हल्ला करून त्याचा हात कापल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली होती, मात्र त्यांना जामीन मिळाला होता, ज्यामुळे नातेवाईकांनी संताप व्यक्त केला होता. आता, पोलिसांनी या आरोपींना पुन्हा अटक केली असून दि. २९ पर्यंत त्यांना पोलिस कोठडी मिळाली आहे.ङ्गडिलिव्हरी ॉय म्हणून काम करणाऱ्या रोहनचे घराशेजारी असणाऱ्या मुलीवर एकतर्फी प्रेम असल्याचा संशय आहे. ही बा मुलीच्या मामाला समजली, त्यामुळं मामाने रोहनला हटकले. या रागातून रोहनने त्याचे मित्र शुभम आणि प्रशांतच्या मदतीने मुलीच्या मामाला संपवण्याचा कट रचला. त्यानुसार थेरगाव येथील लक्ष्मीबाई बारणे उद्यान शेजारी मामाला गाठले, दोन्ही मित्रांनी मामला पकडले अन रोहनने शस्त्राने डोक्याच्या दिशेने वार केला. मामाने वार चुकवला पण धारदार शस्त्राचा वार दोन्ही हाताच्या पंजावर झाला. यात डावा पंजा शरीरापासून वेगळा झाला तर उजवा पंजा अर्धा कापला गेला. याप्रकरणी वाकड पोलिसांनी रोहनसह दोन्ही मित्रांना बेड्या ठोकल्या. पण प्रकरण इतकं गंभीर असताना दुसऱ्याचं दिवशी तिन्ही आरोपींना जामीन कसा काय मिळाला? हा प्रश्न उपस्थित करत नातेवाईक संतप्त झाले. त्यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालायसमोर आंदोलन छेडलं. त्यानंतर वाकड पोलिसांना जाग आली. नातेवाईकांशी चर्चा करुन, नव्या कायद्यामुळं जामीन मिळाल्याचा दावा वाकड पोलिसांनी केला. मात्र या तिघांना पुन्हा एकदा अटक करण्याची परवानगी मिळावी यासाठी न्यायालयाकडे मागणी करण्यात आली. त्यानंतर दाखल गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन विनय कुमार चौबे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.डॉ. शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त, श्री. विशाल गायकवाड साो, पोलीस उप आयुक्त, परि-२, सुनिल कुराडे, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे खुनाचा प्रयत्न करणाऱ्या तीनही आरोपींचा तपासी अधिकारी सपोनि. सुभाष चव्हाण यांनी दि. २६ रोजी दुपारी शोध घेऊन मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्त्वे व सुचना, तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३७(१)(२), ४७ (१), ४८ अन्वये नमुद तरतुंदीचे तंतोतंत पालन करुन पुन:श्च अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींना मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो, कोर्ट नं. ०९, शिवाजीनगर, पुणे यांचे समक्ष मुदतीत पोलीस कस्टडी रिमांड कामी यांनी हजर दि. २९ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे. सदरची उल्लेखनीय कामगिरी विनय कुमार चौबे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.डॉ. शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, मा. सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त, विशाल गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परि-२, श्री. सुनिल कुराडे, सहा. पोलीस आयुक्त साो, वाकड विभाग यांचे मार्गदर्शनाखली वाकड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शत्रुघ्न माळी, सपोनि., सुभाष चव्हाण व एपीपी व्ही.सी. मुरुळीकर यांनी केलेली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि. अनिरुध्द सावर्डे हे करीत आहे.

# संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखीसोहळ्याचे बारामतीकरांकडून भक्तीभावाने स्वागत

**बारामती । प्रतिनिधी**



ज्ञानोबा माऊली तुकाराम.....माऊली...माऊली...या जयघोषात मोठ्या भक्तीभावाने गुरुवारी (ता. २६) बारामतीकरांनी संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे उत्साहात स्वागत केले.

विठुरायाच्या ओढीने पंढरीकडे निघालेल्या वारक-यांमध्येच विठ्ठलाची मूर्ती पाहून त्यांची मनोभावे सेवा करण्याचा वसा बारामतीकरांनी गेल्या अनेक वर्षांपासून घेतला आहे. वारीला जाता येत नाही पण वारक-यांच्या सेवेसाठी काही ना काही प्रयत्न करण्याचा प्रयत्न आबालवृध्द करतात, त्याचाच प्रत्यय गुरुवारी बारामतीत आला.

बारामतीच्या वेशीवर देशमुख चौकामध्ये बारामती नगरपरिषदेच्या वतीने औपचारिक स्वागत करण्यात आले. या प्रसंगी राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार, उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड, मुख्याधिकारी पंकज भुसे, पोलिस निरिक्षक विलास नाळे, वैशाली पाटील यांच्यासह प्रमुख अधिकारी व पदाधिकारी यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले.

दरवर्षी प्रमाणे अनेक मंडळ, संस्था, संघटना व वैयक्तिक स्वरुपातही वारक-यांच्या सेवेसाठी बारामतीकर उत्स्फूर्तपणे पुढे आले. जागोजागी वारक-यांच्या स्वागताचे फ्लेक्स व कमानी उभारण्यात आल्या होत्या. शारदा प्रांगणात बारामती नगरपरिषदेने भव्य मंडप उभारला असून त्यात पालखी सोहळा विसावला. दरम्यान शहरामध्ये एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने खासदार सुनेत्रा पवार यांच्या हस्ते वारक-यांना रेनकोट वाटप केले गेले. रोटरी क्लबच्या वतीनेही रेनकोट वाटप केले गेले.

# भाजप आमदाराला सहआरोपी करा, रविंद्र धंगेंकरांची मागणी; महिला पोलीस विनयभंगवरुन महायुतीत जुंपली?

**पुणे । प्रतिनिधी**



शनिवार वाड्याजवळ गर्दीचा फायदा घेत भाजप पदाधिकाऱ्याने महिला पोलीस अधिकाऱ्याचा विनयभंग केल्याची घटना समोर आली होती . या प्रकरणावरून आता महायुतीतच जुंपल्याचं पाहायला मिळतंय . महिला पोलीस विनयभंगावरून भाजप पदाधिकारी प्रमोद कोंढरे यांच्यासह भाजपचे आमदार हेमंत रासने यांना देखील सहआरोपी करा, अशी मागणी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत असलेल्या रवींद्र धंगेकरांनी (ठर्रीळपवीर ऊहरपसशज्ञरी) केलीय .

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी २३ जून रोजी पुण्यात येणार होते, त्यामुळे भाजप आमदार हेमंत रासने शनिवार वाडा परिसरात पक्ष पदाधिकाऱ्यांसोबत उपस्थित होते. मंत्री येण्यास उशीर होणार असल्याने आमदार रासने यांनी तिथे असलेल्या पदाधिकाऱ्यांना आणि पोलिसांनाही चहा घेण्यासाठी घेऊन गेले. तेवढ्यात भाजपचे पदाधिकारी प्रमोद कोंढरे हे भाजप कार्यकर्ते एका महिला पोलीस निरीक्षकाच्या मागे जाऊन उभे राहिले. या महिला अधिकाऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार, कोंढरे यांनी दोन वेळा त्यांच्या शरीराला लज्जा निर्माण होईल असा स्पर्श केला.

महिला पोलीस निरीक्षकांनी त्या ठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेज मिळवलं आणि झालेला प्रकार पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या कानावर घातला. त्यानंतर प्रमोद कोंढरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, यावरून आता पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार रवींद्र धंगेकर आक्रमक झाले आहेत . आता भाजप पदाधिकारी प्रमोद कोंढरे यांच्यासह भाजपचे आमदार हेमंत रासने यांनाही महिला पोलिस विनयभंगाच्या प्रकरणात सहआरोपी करावे अशी मागणी शिंदेगटाच्या रविंद्र धंगेकर यांनी केलीय. त्यांच्या या मागणीमुळे महायुतीतच जुंपल्याचं चित्र पुन्हा निर्माण झालंय.

हेमंत रासने त्या ठिकाणी होते. त्यावेळी त्यांनी कुठल्याही प्रकारचा जाब कोंढरेला विचारला नाही. परंतु ही महिला जेव्हा वरिष्ठ पोलिसांकडे तक्रार करायला गेली. तेव्हा हेमंत रासने त्यांच्यावर दबाव आणत होते. आणि केस मागे घेण्यास सांगत होते. कुठल्याही दबावाला ती बळी पडली नाही. महिलेचं खरतर कौतुक करायला हवं. त्या महिलेने पोलिसांचा मानसन्मान वाढवला. पोलिसांना माझी विनंती आहे की, हेमंत रासने सारख्या आमदाराला सहआरोपी करावं त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा. अशी मागणी शिंदेगटाचे नेते रविंद्र धंगेकर यांनी केली.

# जुन्नरमध्ये भरदिवसा घरफोडी; तीन चोरट्यांकडून २.३२ लाखांचे दागिने लंपास!

**ओतूर । प्रतिनिधी**



पिंपरीपेढार (ता.जुन्नर) येथील गटवाडी येथे भरदिवसा सहा तोळे सोन्याच्या दागिन्यांची सुमारे दोन लाख ३२ हजार रुपयाचा ऐवज चोरीला गेला. ही घटना मंगळवारी (ता.२४) दुपारी सव्वा दोन वाजेच्या सुमारास घडली. याबाबत ओतूर पोलिसात पिंपरीपेंढार येथील गटवाडीमधील अमित दत्तात्रेय कुटे यांनी तक्रार दिली असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला आहे.

चोरीबाबत अधिक माहिती अशी की, अमित कुटे हे राहत असलेल्या त्यांचे घरी चोरी झाल्याचे त्यांना फोनवर समजल्यावर त्यांनी घरात जाऊन पाहिले असता झोपण्याच्या खोलीमधील कपाटाच्या कप्प्यातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले.

तसेच बिछाण्यावर पाहिले असता दागिण्यांचे रिकामे बॉक्स अस्ताव्यस्त पांगलेले दिसले. यावेळी शेजारी राहणारे निखिल मस्करे यांनी त्यांना सांगितले की, तोंडाला लाल रंगाचा मास्क असलेली व्यक्ती तुमच्या घरात दोन ते तीन वेळा आत बाहेर ये-जा करत असलेली दिसली. त्यामुळे मला त्या व्यक्तीचा संशय आल्याने मी पटकन माझी कपडे घालून घराच्या दारात गेलो असता तुमच्या दारातील युनिकॉर्न मोटार सायकलवर तिघेजण ट्रिपलसिट बसून हायवे रोडचे दिशेने वेगात निघून गेले.

दरम्यान, चोरीत कुटे यांच्या घरातील कपाटात ठेवलेले एक लाख ५ हजार रुपये किमतीचे तीन तोळ्याचे मणी मंगळसूत्र, एक लाख ५ हजार रुपये किमतीचा तीन तोळ्याचा राणीहार १७ हजार ५०० रुपयांचे अर्ध्या तोळा वजनाचे सोन्याचे वाटीमणी तीन हजार ५०० रुपये किमतीचे अर्धा ग्रॅमचे पानाचे आकाराचे छोटे पेंडंट आणि एक हजार रुपयांची रोकड असा मिळून एकूण दोन लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहे.

# लग्नाच्या आमिषाने महिलेची साडेतीन कोटींची ऑनलाइन फसवणूक; आंतरराष्ट्रीय सायबर चोरट्याला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

मॅट्रिमोनियल संकेतस्थळावरून ओळख वाढवून लग्नाचे आमिष दाखवत एका सायबर चोरट्याने महिलेची तब्बल तीन कोटी ६० लाख रुपयांची फसवणूक केली आहे. 'लुकआउट' नोटीस काढत या आंतरराष्ट्रीय सायबर चोरट्याला पुणे सायबर पोलिसांनी मुंबई विमानतळाहून अटक केली आहे.

डॉ. रोहित ओबेरॉय ऊर्फ अभिषेक शुक्ला (मूळ भारतीय, सध्या स्थायिक-ऑस्ट्रेलिया) असे आरोपीचे नाव आहे. याबाबत दिल्लीतील एक महिला तक्रार दिली होती. ही महिला खराडी येथे राहात असताना हा प्रकार घडला होता. याबाबत अप्पर पोलिस आयुक्त (गुन्हे) पंकज देखमुख दिलेल्या माहितीनुसार, या महिलेला तिच्या पहिल्या पतीकडून पाच कोटी रुपयांची पोटगी मिळाली होती. ती या पैशातून लहान मुलांसाठी विविध कार्यक्रम सुरू करणार होती. दरम्यान तिने शादी डॉट कॉमवर लग्नासाठी नोंदणी केली होती. २०२३ मध्ये आरोपीने डॉ. ओबेरॉय या नावाच्या प्रोफाइलद्वारे महिलेला मेसेज केला. स्वतःला ऑस्ट्रेलियात राहणारा डॉक्टर असल्याचे सांगून त्याने महिलेशी मैत्री केली. त्यानंतर तो पुण्यात आला. दोघे काही काळ पुण्यासह भारतात इतर ठिकाणी एकत्र राहिले.

महिलेकडे असलेल्या पैशांची माहिती आरोपीला होती. त्यामुळे त्याने तिचा विश्वास संपादन करून, तिच्या व्यवसायासाठी सिंगापूरहून गुंतवणूक मिळवून देतो, असे सांगितले. त्यासाठी 'इव्हॉन हँदायनी' आणि 'विन्सेंट कुआण' नावाच्या बनावट लोकांची ओळख करून दिली. या तिघांनी मिळून महिलेला सिंगापूर आणि भारतातील विविध बँकांमध्ये टप्प्याटप्प्याने तीन कोटी ६० लाख रुपये भरायला लावले. पैसे मिळाल्यानंतर आरोपी ऑस्ट्रेलियाला गेला आणि महिलेशी संपर्क टाळू लागला. काही महिन्यांनी 'विन्सेंट कुआण' या नावाने महिलेला एक ई-मेल आला. त्यामध्ये 'डॉ. रोहित'चा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. महिलेला त्याबाबत संशय आला. महिलेने मैत्रिणीला घडलेला प्रकार सांगितला. त्यावेळी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. फसवणूक झाल्याचे कळाल्यावर महिलेने तत्काळ सायबर पोलिस ठाण्यात तक्रार



दिली. तपासात 'डॉ. रोहित ओबेरॉय' हे नाव बनावट असून, त्याचे खरे नाव अभिषेक शुक्ला असल्याचे समोर आले. तो मूळचा लखनऊचा असून सध्या ऑस्ट्रेलियात पर्थ येथे स्थायिक आहे. त्याने ऑस्ट्रेलियाचे नागरिकत्व स्वीकारले असून, तेथे लग्नही केलेले आहे. त्यास दोन मुले आहेत.

आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी त्याविरोधात लुकआउट नोटीस जारी केली होती. तो २५ जूनला सिंगापूरहून मुंबई विमानतळावर येणार होता. त्याची माहिती 'इमिग्रेशन ब्युरो'कडून पुणे सायबर पोलिसांना माहिती देण्यात आली. सायबर पोलिसांच्या पथकाने त्याला अटक केली. पोलिसांनी आरोपीला न्यायालयात सादर केले असता, त्याला २९ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. सायबर पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्वप्नाली शिंदे, पोलिस उप-निरीक्षक सुशिल डमरे, हवालदार बाळासो चव्हाण, संदीप मुंढे, नवनाथ कोंडे, सतीश मांढरे, संदीप यादव, संदीप पवार, अमोल कदम आणि सचिन शिंदे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# पुण्यातील फसवणूकबाज अखेर जाळ्यात, १२ वर्षांत ४ राज्यांतील १० हुन अधिक गुन्ह्यांचा पर्दाफाश

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक करून जामिनावर सुटलेल्या आरोपीने मागील बारा वर्षांत चार राज्यांमध्ये दहा पेक्षा जास्त गुन्हे केले होते. विशेष म्हणजे या काळात त्याने तब्बल १५ बनावट ओळखी तयार केल्या होत्या. अखेर एका न्यूज चॅनलवरील बातमीमुळे त्याचा छडा लागला आणि त्याला गोव्याच्या कारागृहातून पुण्यातील न्यायालयात हजर करण्यात आले.**

साहिलअली मोहम्मदअली खान असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्यावर पुण्यात २०१२ मध्ये दाखल झालेल्या आर्थिक फसवणुकीप्रकरणी प्रोडक्शन वॉरंट जारी करण्यात आले होते. मात्र, तो न्यायालयात हजर होत नसल्याने पोलिसांसाठी डोकेदुखी ठरत होता. खेड-शिवापूर येथील रहिवासी व हॉटेल व्यावसायिक संजय विठ्ठलराव कोंडे देशमुख यांनी २०१२ मध्ये सहकारनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. आरोपीने स्वत:ला बिल्डर व डेव्हलपर म्हणून भासवत भूखंड गुंतवणुकीचे आमिष दाखवले. साथीदारांसह बनावट कागदपत्रे तयार करून ५२ लाख रुपयांची फसवणूक केली. यासाठी त्याने बोगस फर्म्स, खोटी बँक खाती आणि बनावट सिमकार्ड्सचा वापर केला.

अटक झाल्यानंतर आरोपीला येरवडा कारागृहात ठेवण्यात आले होते. शंभर दिवसांनी तो जामिनावर बाहेर आला, मात्र त्यानंतर न्यायालयाच्या तारखांना अनुपस्थित राहिला. मागील बारा वर्षांपासून कोंडे देशमुख सातत्याने पाठपुरावा करत होते. अखेर एका दिवशी त्यांनी एका न्यूज चॅनलवर गोव्यातील एका आर्थिक गुन्ह्याची बातमी पाहिली. छायाचित्र पाहून त्यांनी आरोपीची ओळख पटवली. जरी नाव वेगळं दिसत असलं, तरी चेहरा ओळखीचा वाटल्याने त्यांनी गोवा पोलिसांशी संपर्क साधला. खात्री झाल्यानंतर आरोपीला पुण्यात न्यायालयात हजर करण्यात आले. सहकारनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गौड यांनी सांगितले की, आरोपीवर गोवा, हैदराबाद, दिल्ली आणि महाराष्ट्रात दहा पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. यामध्ये 'बॉडी ऑफेन्स' व फसवणुकीसारख्या गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे. सध्या तो पणजी कारागृहात शिक्षा भोगत आहे.

# आई-मुलाच्या डोक्याला लावले पिस्तूल; सराईत गुंडांची गावठी पिस्तूल, कोयते फिरवून खानापुरात दहशत

**खडकवासला । प्रतिनिधी**

सिंहगड पायथ्याच्या दाट लोकवस्तीच्या खानापूरमध्ये सराईत गुंडांनी हातात दोन गावठी पिस्तूल व कोयते घेऊन हैदोस घातला. रिक्षा, कार, टेम्पो, मोटारसायकल आदी १४-१५ वाहनांची तोडफोड करीत प्रसाद महादेव जावळकर याच्या घरात शिरून आई भारती जावळकर व प्रसाद यांच्या डोक्यावर पिस्तूल धरून ठार मारण्याची धमकी दिली तसेच घरातील टीव्ही व इतर मालमत्तेचे नुकसान केले.

हा प्रकार मंगळवारी (दि. २४) रात्री साडेनऊ व बुधवारी (दि. २५) पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास घडला. या घटनेने खानापूर गावासह सिंहगड, पानशेत भागात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन वांगडे म्हणाले, किरकोळ कारणावरून सराईत गुंडांनी घरावर तसेच गावातील वाहनांवर हल्ला करून तोडफोड केली तसेच गावठी पिस्तूल, कोयते अशी प्राणघातक शस्त्रे घेऊन हैदोस घातल्याप्रकरणी हल्लेखोरांचा शोध सुरू आहे. याबाबत हवेली पोलिसांनी सांगितले की, खानापूर गावातील दिलशान अली यांच्या सलून दुकानाजवळ प्रसाद जावळकर याने माझा मित्र विकास सोपान जावळकर याला तुझ्यासोबत यायचे नसताना त्याला तू जबरदस्ती का करतो? असा जाब हल्लेखोर प्रणव रणधीर याला विचारला. त्या वेळी मानव पोपट जाधव याने विकास जावळकर याला जिवे मारण्याची धमकी दिली. नंतर प्रणय रणधीर व त्याच्या साथीदारांनी प्रसाद, विकास जावळकर व रोहित राजू जावळकर यांना शिवीगाळ करीत दमदाटी दिली. त्या वेळी प्रणव रणधीर याने तन्मय धिवार याच्या कमरेचे गावठी पिस्तूल हातात घेऊन प्रसाद याला गोळी मारून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्या



वेळी प्रसंगावधानतेने प्रसाद जावळकर हा तेथून पळून गेला. नंतर त्याने हवेली पोलिस ठाण्यात प्रणव रणधीर व त्याच्या साथीदारांविरोधात फिर्याद दाखल केली.

प्रसाद हा पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गेल्याने चिडून जाऊन प्रणव रणधीर व त्याच्या साथीदारांनी नंतर आज पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास प्रसाद जावळकर याच्या घरात शिरून जोरदार हल्ला केला. त्यात घरातील टीव्हीसह प्रापंचिक मालमत्तेचे हातातील गावठी पिस्तूल, कोयत्यांनी तोडफोड करीत नुकसान केले. त्या वेळी प्रसादची आई भारती जावळकर साहित्य वाचवण्यासाठी पुढे गेली असता तिच्या डोक्यावर पिस्तूल धरत प्रणव रणधीरने, तुझ्या मुलाने पोलिसांत आमच्याविरोधात तक्रार दिली तर तुमच्या सर्व घरादाराला जिवे मारू, अशी धमकी दिली. जोरदार आरडाओरडा ऐकून गावातील लोक प्रसादच्या घरासमोर जमा झाले, त्या वेळी हातात पिस्तूल, कोयते घेऊन हल्लेखोरांनी घरासमोर उभ्या असलेल्या गाड्यांची तसेच भैरवनाथ मंदिर व सरकारी दवाखान्याजवळील वाहनांची तोडफोड करीत मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत दहशत निर्माण केली. याप्रकरणी हवेली पोलिसांनी प्रणव ऊर्फ चिक्या रणधीर, तन्मय ऊर्फ पिनुड्या तानाजी धीवार, अथर्व ऊर्फ झिंग्या दिलीप गायकवाड, आयुष ऊर्फ लाल्या प्रवीण सोनवणे, आदित्य पोपट जाधव (सर्व राहणार खानापूर, ता. हवेली) यांच्यासह १५ जणांविरोधात भादंवि १०९, ३३३ आदी कलमांखाली सशस्त्र प्राणघातक हल्ला, बेकायदा जमाव जमवून मालमत्तेचे नुकसान, दहशत माजविणे, असा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी हवेली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन वांगडे यांच्या देखरेखीखाली पोलिस उपनिरीक्षक शीतल टेंबे, पोलिस अंमलदार संतोष तोडकर, संतोष भापकर यांचे पथक तपास करीत आहेत.

# सामाजिक न्याय दिनानिमित्त संविधान जनजागृती व समता दिंडी संपन्न



**पुणे । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय दिनानिमित्त समाज कल्याण कार्यालय आणि श्री शाहू मंदीर महाविद्यालय पर्वती यांच्यावतीने पुणे शहरात संविधान जनजागृती प्रभातफेरी व समता दिंडीचे आयोजित करण्यात आली, या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या संविधान जनजागृती प्रभातफेरी व समता दिंडीची सुरूवात राजीव गांधी केडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज, अनुराग सोसायटी, शिवदर्शन पूरग्रस्त वसाहत, पर्वती पायथा, अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे श्री शाहू मंदीर महाविद्यालय, पर्वती पायथा येथे समारोप करण्यात आला. यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच संविधान प्रास्ताविकांचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, समाज कल्याण विभागाचे वसतिगृहातील गृहप्रमुख, गृहपाल, विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी, तसेच ज्येष्ठ नागरिक आदी उपस्थित होते, अशी माहिती सहायक आयुक्त समाज कल्याण विशाल लोंढे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.